J.K. FURNISHING
Sleepwell Gallery
Your Own Mattress Store
• Foam Mattress • Pillow, Cushions
• Coir Mattress • Sofa Fabric
Bhaskar Jawarkar
9146099196 / 9422190280
Aditya Jawarkar
9689509334
Near Best Cinema, Jaistambh Chowk, Amravati. Tel. 0721-2675898

पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक
# सिटी न्यूज सुपरफास्ट
अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २५२ ■ रविवार, दि. २२ मार्च २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६
RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

## आठव्या वेतन आयोगामुळे....
# पगार अन् पेन्शनमध्ये होणार चांगलीच वाढ....!

वृत्तसंस्था २२ मार्च

**नवीदिल्ली:** आठव्या वेतन आयोगाची आतुरतेने वाट पाहणाऱ्या लाखो कर्मचाऱ्यांसाठी एक महत्त्वाची बातमी आहे. या वेतन आयोगाच्या माध्यमातून, कर्मचाऱ्यांचे वेतन आणि निवृत्तीवेतनात (पेंशन) मोठी वाढ होण्याची अपेक्षा आहे. कर्मचारी संघटनांनी महागाई भत्त्याच्या गणना पद्धतीत बदल करण्याची मागणी केली आहे. महागाई भत्त्याच्या गणनेतील बदलांबाबत सरकारने अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा केली नसली तरी, हा विषय बऱ्याच काळापासून चर्चेचा मुद्दा बनला आहे.

दरम्यान, आयोगाने आपल्या प्रश्नावलीवर प्रतिक्रिया सादर करण्याची अंतिम मुदत वाढवली आहे. विविध संस्था आता ३१ मार्च २०२६ पर्यंत आपल्या प्रतिक्रिया सादर करू शकतात. महागाई भत्त्याचे सूत्र बदलण्याच्या मागणीबाबत, संघटनांचा असा युक्तिवाद आहे की, सध्याचे सूत्र हे मूळतः भूतकाळातील महागाई दरांवर आधारित होते. आता महागाई वाढत असल्याने, गणना



पद्धतही त्यानुसार अद्ययावत केली गेली पाहिजे. संघटनांच्या मते, पूर्वी लोकांचा खर्च कमी होता; परंतु इंटरनेट, डिजिटल सेवा, शिक्षणाचा वाढता खर्च, वैद्यकीय खर्च आणि इतर विविध खर्चांमुळे आता राहणीमानाचा खर्च लक्षणीयरीत्या वाढला आहे. सध्याचे सूत्र या सर्व घटकांचा विचार करत नाही. सध्या, सरकार तीन सदस्यांचे कुटुंब गृहीत धरून महागाई भत्ता निश्चित करते; मात्र संघटनांचे असे मानणे आहे की, ही गणना पाच सदस्यांचे कुटुंब गृहीत धरून केली गेली पाहिजे.

सरकार सहसा होळी आणि दिवाळी या सणांच्या आसपास महागाई भत्त्याची घोषणा करते. त्यामुळे, महागाई भत्त्यातील वाढीबाबतची घोषणा आता मार्चच्या अखेरीस किंवा एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात होण्याची अपेक्षा आहे. महागाई भत्त्यातील वाढीचे लाभ १ जानेवारी २०२६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू होतील. याचा अर्थ असा की, कर्मचाऱ्यांना 'थकबाकी' म्हणजेच मागील महिन्यांच्या वेतनातील फरक एकदाच मिळेल.

संघटनांनी इतरही अनेक मागण्या मांडल्या आहेत. यामध्ये महागाई भत्ता मूळ वेतनामध्ये विलीन करण्याची मागणी समाविष्ट आहे, जेणेकरून त्याचा परिणाम निवृत्तीवेतन आणि इतर भत्त्यांवरही दिसून येईल. शिवाय, त्यांनी 'जुनी निवृत्तीवेतन योजना' पुन्हा लागू करण्याची मागणी केली आहे. वेतनात लक्षणीय आणि अर्थपूर्ण वाढ सुनिश्चित करण्यासाठी, ८ व्या वेतन आयोगाच्या शिफारशींमध्ये योग्य असा 'फिटमेंट फॅक्टर' समाविष्ट करण्याची मागणीही त्यांनी केली आहे.

## डिमोना अणू केंद्राजवळ क्षेपणास्त्रे कोसळली!

**डिनोमा :** मध्यपूर्वेतील युद्ध आता अत्यंत भीषण आणि क्रूर वळणावर पोहोचले आहे. इराणने इस्त्रायलच्या नागरी वस्त्यांवर थेट क्षेपणास्त्र हल्ला चढवत मोठी तबाही माजवली आहे. विशेषत: इस्त्रायलचे अणू केंद्र असलेल्या डिमोना आणि शेजारील अराद शहराला इराणने लक्ष्य केले असून, या हल्ल्यात १०० हून अधिक नागरिक जखमी झाले आहेत. यामध्ये लहान मुलांचाही समावेश असल्याने जगभरातून संताप व्यक्त केला जात आहे. या हल्ल्यानंतर इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू संतापले असून, त्यांनी इराणला धडा शिकवण्याची शपथ घेतली आहे.

सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, इराणचे एक क्षेपणास्त्र डिमोना शहरात पडले आहे. डिमोना हे इस्त्रायलच्या अणू सुविधांचे मुख्य केंद्र मानले जाते. या संवेदनशील भागाला लक्ष्य केल्यामुळे आता इस्त्रायल इराणवर महाभयंकर पलटवार करण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. माजी पंतप्रधान नफ्ताली बेनेट आणि यायर लॅपिड यांनीही या घटनेचा निषेध करत, हा संपूर्ण देश एकजुटीने या संकटाचा सामना करेल असे म्हटले आहे. सध्या इस्त्रायलमधील हॉस्पिटल्स जखमींनी भरली असून सर्वत्र बचाव कार्य युद्धपातळीवर सुरू आहे. इस्त्रायली परराष्ट्र मंत्रालयाने या हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध केला आहे.

## मुंबईच्या सिद्धीविनायक मंदिरातील दानपेटीवर कर्मचाऱ्याचाच डल्ला!

प्रतिनिधी २२ मार्च

**मुंबई :** मुंबईतील प्रसिद्ध सिद्धीविनायक मंदिरातून एक अतिशय धक्कादायक बातमी समोर आली आहे. प्रभादेवी येथील सिद्धीविनायक मंदिरात चोरीची घटना उघड झाली आहे. धक्कादायक बाब म्हणजे मंदिरातील कर्मचाऱ्यानेच या दानपेटीच्या पैशांवर डल्ला मारला आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून ही चोरीची घटना मंदिरातील सीसीटीव्ही कॅमेरामध्ये कैद झाली आहे. दरम्यान या प्रकरणी दादर पोलिसांनी आरोपीला बेड्या ठोकल्या असून इतर काही लोक देखील या चोरी प्रकरणात सहभागी असल्याची शक्यता आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सिद्धीविनायक मंदिर पुजारी कक्षात असलेल्या दानपेटीतून १० हजार रुपयांची चोरी झाल्याची माहिती समोर आली आहे. मंदिर प्रशासनाच्या एका महिला पदाधिकारीला हे प्रकार सीसीटीव्ही कॅमेरामध्ये दिसला, परिणामी त्यांनी या गंभीर प्रकारची माहिती वरिष्ठांकडे दिली.

# अखेर नियतीने घात केला, अन् सर्वज्ञ हरपला
## शवविच्छेदनानंतर मृत्यूचे कारण समजेल - पोलिस

प्रतिनिधी २२ मार्च

**अकोला:** शिवर परिसरातील ढोणे कॉलनी, जिथे काही दिवसांपूर्वी मुलांच्या किलबिलाटाने सकाळ व्हायची, तिथे आज फक्त सुन्न करणारी शांतता आणि हुंदके ऐकू येत आहेत. १९ मार्चची ती सकाळ निंबाळकर कुटुंबासाठी काळरात्र ठरेल, असं कोणालाही वाटलं नव्हतं. सकाळी ११ च्या सुमारास सर्वज्ञ नीलेश निंबाळकर हा चिमुकला खेळता खेळता अचानक दिसेनासा झाला. आई-वडिलांनी हाका मारल्या, गल्ली पालथी घातली, पण उत्तर आलं नाही. एमआयडीसी पोलिसांनी तातडीने डॉग स्क्वॉड आणले, नागरिकांनी रात्रंदिवस शोध घेतला. प्रत्येकाच्या मनात एकच प्रार्थना होती 'सर्वज्ञ सुखरूप असावा.' सोशल मीडियावर त्याचे फोटो फिरत होते, प्रत्येकजण मदतीसाठी धावत होता. पण निसर्गाचा आणि नियतीचा खेळ वेगळाच होता. कृषी विद्यापीठाच्या नाल्याजवळ सर्वज्ञाचा मृतदेह कुंजलेल्या अवस्थेत सापडला. तो ढोणे कॉलनीतून इथ पर्यंत कसा आला आणि त्याचा मृत्यू कसा झाला याचा शोध पोलिस घेत आहे.

'मामा आणि आजोबांच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहत नव्हत्या, तर जणू रक्ताचं पाणी होत होतं. ज्या नातवाच्या भविष्याची स्वप्ने त्यांनी पाहिली, त्याला आज मातीच्या कुशीत जाताना पाहण्याचं दुर्दैव त्यांच्या नशिबी आलं.' त्याच्या आईला वडीलांना काय सांगावे हा प्रश्नच मामाच्या डोळ्यात दिसत होता. पोलीस तपास करत आहेत, शोधमोहीम संपली आहे, पण निंबाळकर कुटुंबाच्या आयुष्यात निर्माण झालेली पोकळी कधीही भरून न निघणारी आहे.



**असुरक्षित विद्यापीठ**
कृषी विद्यापीठाची स्वतःची स्वतंत्र सुरक्षा यंत्रणा आहे. कृषी विद्यापीठाच्या नाल्यानजीक सर्वज्ञाचा मृतदेह मिळतो. तो शिवर पासून तिथे कसा आला आणि त्याचा तिथे कसा मृत्यू झाला असा प्रश्न अनुत्तरीत आहे. कृषी विद्यापीठाची सुरक्षा यंत्रणा काय करत होती. असा प्रश्न विचारला जात आहे. सर्वज्ञ च्या मृत्यूचे कारण शोधताना विद्यापीठाच्या सुरक्षा यंत्रणेचा कोणी आढावा घेणार आहे की नाही अशी चर्चा नागरिकांमध्ये आहे.

# महावितरणचा निष्काळजीपणा की 'बळी'
## ज्ञानेश्वरचा मृतदेह नेणार नसल्याची गावकऱ्यांची भूमिका

प्रतिनिधी २२ मार्च

**हिवरखेड:** स्मार्ट मीटरची सक्ती करत ग्राहकांवर जबरदस्ती करणाऱ्या महावितरणच्या निष्काळजीपणामुळे एका निष्पाप तरुणाचा जीव गेला आहे. ज्ञानेश्वर कैलास गोमासे या तरुण कामगाराचा विद्युत तारांच्या स्पर्शाने दुर्दैवी मृत्यू झाल्याने संपूर्ण परिसरात संतापाची लाट हिवरखेड परिसरात उसळली आहे. हिवरखेड येथील तोल काट्यावर ज्ञानेश्वरचा मृतदेह ठेवण्यात आला आहे.

काल २१ मार्च रोजी रात्री ज्ञानेश्वर हा आयशर ट्रकवर आपले कामकाज संपवून तोल काट्यावर मोजणी करत होता. मात्र, तिथेच लोंबलेल्या महावितरणच्या जीवघेण्या विद्युत तारांचा त्याला स्पर्श झाला. हा धक्का इतका भीषण होता की ज्ञानेश्वरचा जागीच



मृत्यू झाला.

परिसरात अनेक ठिकाणी वीज तारा लोंबलेल्या असतानाही महावितरणने याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. घटनेनंतर संतप्त नातेवाईक आणि ग्रामस्थांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली. जोपर्यंत कुटुंबाला न्याय मिळत नाही, तोपर्यंत मागे न हटण्याचा पवित्रा जमावाने घेतला. परिस्थिती हाताबाहेर जाऊ नये म्हणून हिवरखेड पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. ज्ञानेश्वर हा आपल्या कुटुंबाचा आधार होता. त्याच्या जाण्याने गोमासे कुटुंबावर आभाळ कोसळले आहे. 'केवळ आश्वासन नको, तर ठोस आर्थिक मदत हवी,' अशी आक्रमक मागणी आता ग्रामस्थांनी महावितरणकडे केली आहे.'प्रशासनाने तात्काळ पंचनामा करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी आणि पीडित कुटुंबाला न्याय द्यावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल,' असा इशारा संतप्त नागरिकांनी दिला आहे.

## महापालिकेच्या ८८ नगरसेवकांपैकी त्या नगरसेवकांमध्ये 'धाकधुक'
### अनधिकृत बांधकाम ठरणार सदस्यत्व रद्द होण्याचे मुख्य कारण ?

अकोला महानगरपालिका
जनहित सर्वतोपरी

प्रतिनिधी २२ मार्च

**अकोला:** अकोला महानगरपालिकेच्या राजकारणात सध्या मोठी खळबळ उडाली आहे. महापालिका आयुक्तांकडून कोणत्याही क्षणी होणारी बांधकामांची मोजणी अनेक नगरसेवकांसाठी अडचणीची ठरू शकते. उमेदवारी अर्ज भरताना प्रत्येक उमेदवाराला एक शपथपत्र सादर करावे लागते. या शपथपत्रातील मुद्दे आता शहरातील ८० निवडलेल्या ८ स्विकृत नगरसेवकांसाठी अडचणीचे ठरत आहे. दरम्यान, अनधिकृत बांधकाम वाले नगरसेवक कोण अशी विचारणा राजकीय वर्तुळात चर्चिली जात आहे. महापालिका निवडणुक लढविताना नगरसेवकांनी स्वतः, पत्नी/पती किंवा अवलंबितांनी कोणतेही अनधिकृत/अवैध बांधकाम केलेले नाही. जर निवडून आल्यानंतर असे बांधकाम आढळल्यास किंवा सिद्ध झाल्यास, कलम १० (१डी) नुसार संबंधित नगरसेवक पदावर राहण्यास अनर्ह अर्थात नगरसेवक पदच रद्द ठरेल. महापालिका आयुक्तांकडे हे अधिकार आहेत की ते कोणत्याही तक्रारीवरून किंवा स्वतःहून बांधकामांची तपासणी करून अहवाल सादर करू शकतात. जर प्रत्यक्ष मोजणीत बांधकाम अनधिकृत आढळले, तर ते केवळ नियमांचे उल्लंघन नसून 'खोटे शपथपत्र' सादर केल्याचाही गंभीर गुन्हा ठरू शकतो. या नियमाच्या कचाट्यात अनेक विद्यमान आणि माजी नगरसेवक येण्याची शक्यता असल्याने राजकीय वर्तुळात चिंतेचे वातावरण आहे.

## अशोक खरातच्या दरबारात जाणाऱ्या मंत्र्यांना सहआरोपी करा - संजय राऊत

प्रतिनिधी २२ मार्च

**मुंबई :** भोंदूबाबा अशोक खरातच्या दरबारात जाणाऱ्या सर्व मंत्र्यांना सहआरोपी करा, असे म्हणत खा. संजय राऊत यांनी निशाणा साधला आहे.

महाराष्ट्र हा पुरोगामी, सुधारणावादी विचारांचा महाराष्ट्र आहे. अशा महाराष्ट्रात भोंदुगिरी आणि बुवाबाजी फोफावत असेल आणि त्यात आमचे सत्ताधारी सहभागी होत असतील तर भोंदूबाबाच्या दरबारात जाणाऱ्या सर्व राजकारण्यांना, खासकरून मंत्र्यांना सहआरोपी केले पाहिजे. मंत्र्यांना सहआरोपी करेपर्यंत भोंदूगिरी थांबणार नाही. जे कुणी यातून पळवाट काढत आहेत ते खोटं बोलत आहेत. अशोक खरात हे काय प्रकरण होतं ते आम्हाला माहित नव्हतं. या प्रकारचा पहिला गुन्हा अशोक खरातवर २००३ मधे दाखल झाला, २००५ मध्ये झाला आहे. नाशिकमधल्या एका वृत्तपत्रात खरातच्या कारनाम्यांबाबत लेखमालाही प्रसिद्ध झाली होती. त्यावेळी पत्रकाराला धमक्या देण्यात आल्या. तरीही मंत्री, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री हे अशोक खरातकडे जात असतील, त्याच्या पायावर डोकं ठेवत असतील, पूजाविधी करत असतील, तंत्र-मंत्र, जादूटोणा करत असतील तर या सगळ्यांना सहआरोपी के पाहिजे. नाशिकचे पोलीस आयुक्त संदीप कर्णिक सक्षम अधिकारी आहेत. त्यामुळे जो मुख्य आरोपी पकडला आहे त्याचा जबाब नोंदवून घेतला

# रुपाली चाकणकरांची राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षपदावरुनही उचलबांगडी होणार!

प्रतिनिधी २२ मार्च

**मुंबई :** विकृत भोंदूबाबा अशोक खरात याच्याशी लागेबांधे असल्यामुळे राज्य महिला आयोगाचे अध्यक्षपद गमवावे लागलेल्या रुपाली चाकणकर यांना लवकरच आणखी एक मोठा झटका बसण्याची शक्यता आहे. आता रुपाली चाकणकर यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला प्रदेशाध्यक्ष पदावरुनही उचलबांगडी होण्याची दाट शक्यता वर्तविली जात आहे.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या मुंबईतील देवगिरी बंगल्यावर शनिवारी रात्री राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष प्रफुल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील



तटकरे आणि राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्ष सुनेत्रा पवार यांची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत अशोक खरात प्रकरणामुळे राष्ट्रवादी काँग्रेसची होणारी बदनामी कशी रोखता येईल, यासंदर्भात चर्चा झाल्याचे समजते. त्यासाठी रुपाली चाकणकर यांच्याकडून राष्ट्रवादी काँग्रेसचे महिला प्रदेशाध्यक्ष पदही काढून घेतले जाऊ शकते.

### भोंदू अशोक खरात आयकर विभागाच्या 'रडार'वर!

अध्यात्माच्या नावाखाली अनेक महिलांचे लैंगिक शोषण करणारा नाशिकमधील विकृत भोंदूबाबा अशोक खरातच्या मालमत्ताची आयकर विभागाकडून आता चौकशी केली जाणार आहे. भोंदूबाबा खरात प्रकरणी तांत्रिक पुरावे गोळा करून मालमत्ता, आर्थिक संबंधाचे पुरावे आणि इतर माहिती एसआयटीकडून गोळा करण्याचे काम सुरू आहे. दरम्यान, एसआयटीकडून तपास सुरू असतानाच आता आर्थिक चौकशीला देखील वेग येणार आहे. खरातच्या मालमत्ता आणि कोट्यवधींच्या व्यवहारांची यात तपासणी होणार असल्याची माहिती आहे.

### विशेष पथकाची स्थापना

अशोक खरात याला काही दिवसांपूर्वी गुन्हे शाखेने अटक केली होती. याप्रकरणाच्या चौकशीसाठी विशेष तपास पथकाची स्थापना करण्यात आली आहे. आयपीएस तेजस्वी सातपुते या पथकाचे नेतृत्व करत आहेत. शनिवारी दुपारी अशोक खरात याला चौकशीसाठी कार्यालयात आणण्यात आले होते. त्यानंतर तब्बल सात तास त्याची कसून चौकशी करण्यात आली. या चौकशीतून कोणती माहिती समोर येणार, हे बघावे लागेल.

काल देवगिरी बंगल्यावर ही बैठक सुरु असताना रुपाली चाकणकर यांना तसा संदेश धाडण्यात आल्याची सूत्रांची माहिती आहे. त्यामुळे रुपाली चाकणकर लवकरच राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा देऊ शकतात. रुपाली चाकणकर यांच्यानंतर राज्य महिला आयोगाचा अध्यक्ष आणि प्रदेशाध्यक्ष म्हणून कोणाची नेमणूक करायची, याबाबतही काल देवगिरी बंगल्यावरील बैठकीत चर्चा झाल्याचे समजते.

### तीन पीडित महिलांनी वाचला खराताच्या कुकर्माचा पाढा

नाशिकमधील स्वयंघोषित ज्योतिषी अशोक खरात प्रकरणात दररोज नवे धक्कादायक खुलासे समोर येत असताना आता तपासाला आणखी वेग आला आहे. आधीच गंभीर आरोपांना सामोरे जात असलेल्या खरातविरोधात आणखी तीन पीडित महिलांनी पुढे येत तक्रार नोंदवण्याची तयारी दर्शवली आहे. त्यामुळे या प्रकरणाची व्याप्ती आणखी वाढली असून, तपास यंत्रणांना महत्त्वाचे धागेदोरे मिळण्याची शक्यता आहे.

# दारव्ह्यात सहा वर्षाच्या चिमुरडीचा खून शेजाऱ्यांनीच घडविले हत्याकांड!
## अपहरणाची दाखल होती तक्रार, आरोपींना घेतले ताब्यात





### २५ हजारांचे ठेवले होते बक्षीस

सहा वर्षांची शिवानी पंकज जाधव २० मार्चपासून हरवली होती. तिच्या शोधासाठी यवतमाळ पोलिसांनी विशेष मोहीम राबवून माहिती देणाऱ्यास २५ हजारांचे बक्षीस जाहीर केले होते. मुलीची माहिती मिळताच नागरिकांनी तत्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले होते. दरम्यान तिचा मृतदेहच आढळून आला. या प्रकरणामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे

प्रतिनिधी २२ मार्च

**यवतमाळ :** जिल्ह्यातील दारव्हा तालुक्यातील बोथ गावात सहा वर्षांच्या अल्पवयीन मुलीच्या अपहरणानंतर तिचा खून झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. जुन्या वादातूनच हा खून झाल्याचे प्राथमिक तपासात समोर आले असून, विशेष म्हणजे मृत मुलीच्या घराशेजारी राहणाऱ्यांनीच हत्याकांड घडवून आणल्याचे स्पष्ट झाले आहे. शिवानी पंकज जाधव (६ वर्षे ८ महिने) रा. बोथ असे मृतक मुलीचे नाव आहे.

शिवाणीच्या अपहरणाची तक्रार २० मार्च रोजी दारव्हा पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली होती. त्यानुसार अपहरणाचा गुन्हा नोंदवून पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षकांनी स्वत: लक्ष घालत शोधमोहीम राबविण्याच्या सूचना दिल्या. २१ मार्च रोजी पोलीस अधीक्षकांच्या उपस्थितीत बोथ गावात मोठ्या प्रमाणावर शोधमोहीम राबविण्यात आली. गावातील संशयित घरांची झडती घेत असताना फिर्यादीच्या शेजारी राहणाऱ्या कैलास जाधव यांच्या घरात पलंगाखाली मुलीचा मृतदेह लपवून ठेवलेला आढळून आला. पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह लपवण्यात आल्याचे तपासात स्पष्ट झाले. या प्रकरणी कैलास विलास जाधव (३०), माला विलास जाधव (२६), सोनी विलास जाधव (३२), रंजना सोनु जाधव (३०) तसेच एका विधी संघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेण्यात आले आहे.

सिटी न्यूज अमरावती
रविवार, दि. २२ मार्च २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात २४ मार्च रोजी 'शहीद दिन' व्याख्यानाचे आयोजन

**अमरावती:** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना (रासेयो) विभागाच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, २४ मार्च २०२६ रोजी शहीद दिनानिमित्त विशेष व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम दुपारी २.३० वाजता विद्यापीठ परिसरातील डॉ. श्रीकांत जिचकार स्मृती संशोधन केंद्र येथील सभागृहात संपन्न होईल. 'शहीदांच्या स्वप्नातील भारत' या विषयावर श्री. व्यंकटेश महाविद्यालय, देऊळगाव राजा येथील मराठी विभाग प्रमुख प्रा. मधुकर बाळासाहेब जाधव अभ्यासपूर्ण व्याख्यान देणार आहेत. याप्रसंगी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे अध्यक्षस्थान भूषवणार असून याप्रसंगी विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. विजय नागरे, तसेच अधिसभा सदस्य श्री. नितीन टाले आणि श्री. कैलास चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

# संयम, समता आणि मानवतेचा प्रकाशोत्सव : रमजान ईद चे पर्व उत्साहात साजरे

### ♦ संयम, त्याग आणि मानवतेचा संदेश देणारा सण म्हणजे ईद - उल - फितर - आमदार सुलभाताई खोडके

प्रतिनिधी २२मार्च

**अमरावती :** भारतीय समाजाच्या सांस्कृतिक विश्वात विविध धर्म, परंपरा आणि श्रद्धा यांचे सुंदर सहअस्तित्व आढळते. या विविधतेतूनच एकात्मतेची खरी ताकद निर्माण होते. प्रत्येक सण हा केवळ एका धर्मापुरता मर्यादित नसून तो संपूर्ण समाजाला काही ना काही जीवनमूल्य देऊन जातो. अशाच मूल्यांनी समृद्ध असलेला संयम, त्याग आणि मानवतेचा संदेश देणारा सण म्हणजे ईद - उल - फितर, ज्याला आपण रमजान ईद म्हणून ओळखतो. रमजान महिन्याच्या अखेरीस येणारी ही ईद केवळ आनंदाचा उत्सव नाही., ती आहे एका महिनाभर चाललेल्या आत्मशुद्धीच्या, संयमाच्या तपस्येचा आणि मानवतेच्या जाणीवेचा उत्सव आहे. असे प्रतिपादन आमदार -. सुलभाताई संजय खोडके यांनी उपस्थितांना संबोधून केले.



शनिवार दिनांक २१ मार्च २०२६ रोजी अमरावती येथील पठाण चौक मार्ग परिसर स्थित ईद - उल - फितर निमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. रमजान हा केवळ धार्मिक विधी नसून सामाजिक संवेदनशीलता वाढवणारा कालखंड आहे. रमजान संपल्यानंतर येणारी ईद म्हणजे आनंद, उत्साह आणि कृतज्ञतेचा दिवस. एक महिनाभर केलेल्या साधनेनंतर हा दिवस येतो, या दिवशी मुस्लिम बांधव एकत्र येऊन नमाज अदा करतात,एकमेकांना आलिंगन देतात आणि ईद मुबारक म्हणत आनंद साजरा करतात. परंतु ईदचा खरा अर्थ केवळ नवीन कपडे, स्वादिष्ट पदार्थ किंवा उत्सव यात नाही., तर तो आपल्या मनातील कटुता विसरून एकमेकांशी प्रेमाने वागण्याचा संदेश. ईद - उल - फितर च्या निमित्त आमदार - सौ. सुलभाताई खोडके, आमदार - संजय खोडके तसेच यश सुलभा संजय खोडके यांनी यावेळी सर्व उपस्थितांना ईद मुबारक म्हणत शुभेच्छा दिल्यात.

यावेळी चिमुकल्यांना गुलाबपुष्प देऊन खोडके दाम्पत्यांनी शुभेच्छा दिल्यात. यासोबतच सर्व उपस्थित मान्यवरांना पण शुभेच्छा दिल्यात. तसेच ज्येष्ठ नागरिक, युवक बांधवाना ईद मुबारक म्हणत शुभेच्छा दिल्यात.आजच्या काळात समाज अनेक आव्हानांना सामोरा जात आहे. धार्मिक तणाव, सामाजिक विषमता, आर्थिक असमानता आणि वाढती असहिष्णूता. अशा परिस्थितीत रमजान ईद आपल्याला एक वेगळा मार्ग दाखवते संयमाचा, सहिष्णूतेचा आणि परस्पर आदराचा या शब्दसुमनांनी आमदार - संजय खोडके यांनी ईद - उल - फितर निमित्ताने सर्व उपस्थितांना शुभेच्छा दिल्या. रमजान ईद म्हणजे संयम, समता आणि मानवतेचा प्रकाशोत्सव म्हणून ओळखला जातो.

## नांदगाव खंडेश्वर येथे तालुकास्तरीय आरोग्य जनसंवाद कार्यक्रम

प्रतिनिधी २२ मार्च

**नांदगाव खंडेश्वर :** इकोनेट संस्थेच्या माध्यमातून नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील लोणी, मंगरूळ चव्हाळा आणि सातारगाव प्राथमिक आरोग्य केंद्रे तसेच चोर माहुली, धानोरा गुरव, धानोरा फसी, वडूरा, मंगरूळ चव्हाळा उपकेंद्रांमधील आरोग्य सेवांचा मागील सहा महिन्यांपासून सखोल अभ्यास करण्यात आला होता.

या अभ्यासाच्या पार्श्वभूमीवर नागरिक, आरोग्य विभाग आणि प्रशासन यांच्यात थेट संवाद घडवून आणण्यासाठी दिनांक १८ मार्च रोजी पदमपाणी मंगलम, नांदगाव खंडेश्वर येथे तालुका स्तरीय आरोग्य जनसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



या कार्यक्रमाला तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. प्राजक्ता वानखडे, सह गटविकास अधिकारी निलेश ठाकरे, इकोनेट संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी गौरीताई भोपटकर, इकोनेटचे राहुल साळवी, सुनिता देशमुख, मेडिकल ऑफिसर नितेश हारळकर मंगरूळ चव्हाळा प्राथमिक आरोग्य केंद्र, गुल्हाने सर लोणी प्राथमिक आरोग्य केंद्र, मुकेश पारडे सर ग्रामक प्राथमिक आरोग्य केंद्र,महिला व बालकल्याण विभागाचे प्रतिनिधी, अपेक्षा या संस्थेचे सामाजिक कार्यकर्ते सोमेश्वर चांदूरकर, समर्थ बहुउद्देशीय सामाजिक संस्था अध्यक्ष बाबूसिंग पवार, सुनील धनविजय, पत्रकार उमेश चौकुडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

तसेच आरोग्य विभागातील अधिकारी, तालुक्यातील विविध प्राथमिक आरोग्य केंद्रांचे वैद्यकीय अधिकारी आणि आरोग्य कर्मचारी सुद्धा मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमामध्ये तालुक्यातील ओंकारखेडा, शिरपूर, धानोरा फसी, वडूरा, हिंगलाजपूर देवी, हिवरा, मुरादे, सावंगी, रोहना, बहिलोरपूर, शिवरा, मंगरूळ चव्हाळा या गावांमधून मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले.

## विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १३ जानेवारी २०२६ च्या अधिसूचनेत सुधारणा करण्याची मागणी

प्रतिनिधी २२मार्च

**अमरावती :** उच्च शिक्षण व्यवस्थेत समता प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने विद्यापीठ अनुदान आयोग यांनी १३ जानेवारी २०२६ रोजी जारी केलेल्या अधिसूचनेत सुधारणा करण्याची गरज असल्याचे निवेदन देण्यात आले. हे निवेदन संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथील कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्यामार्फत सादर करण्यासाठी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांना देण्यात आले.

राष्ट्रीय ओबीसी मुक्ती मोर्चाच्या वतीने जिल्हा संयोजक प्रफुल्ल मंदा श्रीधर यांच्या अध्यक्षतेखाली हे निवेदन देण्यात आले.

या वेळी नरेंद्र धर्माळे (अध्यक्ष, शिक्षण बचाव समन्वय समिती, अमरावती), विजय डवरे (संविधान जागर अभियान, अमरावती), संदीप यादव, मो. अफसर भाई (अमरावती) तसेच सामाजिक कार्यकर्ते महेश ढवळे (यवतमाळ) उपस्थित होते.

या निवेदनात नमूद करण्यात आले की, सदर अधिसूचनेत ङ्घअधिनियम, आयोग, समता, पीडित व्यक्ती, जातीय आधारित भेदभाव, संस्था प्रमुख, कर्मचारी, उच्च शिक्षण संस्था, लोकपाल, विद्यार्थीङ्घ अशा महत्त्वाच्या संज्ञांचा अर्थ स्पष्टपणे नमूद केलेला नाही. त्यामुळे अधिसूचनेची अंमलबजावणी करताना अनेक अडचणी निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

तसेच आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांना उच्च शिक्षणात समान संधी मिळण्यासाठी आवश्यक तरतुदी स्पष्टपणे समाविष्ट करण्याची मागणी करण्यात आली. उच्च शिक्षण घेत असताना एखाद्या विद्यार्थ्यावर किंवा व्यक्तीवर भेदभावाची घटना घडल्यास त्याबाबतची चौकशी व कार्यवाही जास्तीत जास्त ३० दिवसांच्या आत पूर्ण व्हावी, अशीही सूचना या निवेदनाद्वारे करण्यात आली.

यासंदर्भात सविस्तर चर्चा करून अधिसूचनेत आवश्यक त्या सुधारणा कराव्यात, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

## मॅफेड्रॉन अंमली पदार्थाचा मुंबई वरून शहरात पुरवठा करणाऱ्या मुख्य सुत्रधारांवर शहर गुन्हे शाखे कडुन कारवाई

प्रतिनिधी २२मार्च

**अमरावती :** पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण, गुन्हे शाखा अमरावती शहर यांचे नेतृत्वात पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार नेमुन तसेच तांत्रिक विश्लेषनाच्या आधारे उल्लेखनिय अशी प्रभावी कार्यवाही केली आहे.

२०/०३/२०२६ रोजी गुन्हे शाखा पथक गुन्हेशाखा कार्यालयात हजर असतांना खास व विश्वासु बातमीदाराने गुन्हे शाखा अमरावती शहर येथे येवुन बातमी दिली की नागपुरी गेट पोलीस स्टेशन अप.क. ११२ २०२६ कलम ८ (क) २१ (क) २८,२९ एन.डी.पी.एस ॲक्ट अन्वये दाखल गुन्हयातील पाहिजे आरोपी अजिम असद शेख रा. माहीम,



मुंबई हा मॅफेडॉन (एम.डी) या अंमली पदार्थाचा पुरवठा करणारा मुख्यसुत्रधार असून तो वर नमूद गुन्हयातील पाहिजे असलेल्या दुस-या आरोपी नामे शेख समीर शेख अमीर रा. गवळीपुरा अमरावती याला एम. डी. या अंमली पदार्थाचा चा पुरवठा करण्यासाठी अमरावती येथे येणार असल्याबाबत विश्वसनीय खबर मिळाली. इसम नामे अजिम असद शेख रा. माहिम दर्ज्याच्या मागे माहिम वेस्ट मुंबई हा मॅफेडॉन (एम.डी) या अंमली पदार्थाचा व्यवसाय करतो व अमरावती मधील एम.डी या अंमली पदार्थाचा व्यवसाय करणा-या इतर काही लोकांकरीता मुंबई वरून मॅफेडॉन (एम.डी) हा अंमली पदार्थाचा पुरावठा करतो. यापुर्वी त्याचेवर सन २०२५ मध्ये तेलंगणा राज्यात ५५० किलो गांजा बाळगले प्रकरणी गुन्हा दाखल असुन अंमली पदार्थ बाळगणे व विक्री करणेबाबतचे गुन्हे दाखल आहेत.

नमुद इसम यांने राजस्थान येथून मॅफेडॉन (एम.डी) हा अंमली पदार्थ बोलावला असुन तो दिनांक २०/०३/२०२६ रोजी सायंकाळच्या सुमारास अमरावती मधील त्यांच्या ग्राहकांना विक्री करणे करीता तसेच अमरावती शहरात मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थाची साठवणुक करूण विक्री करणा-या एम.डी माफीयांना पुरवठा करण्याकरीता लालखडी ते नवसारी रिंगरोड येथे येणार आहे. अशी खात्रीलायक बमाहिती मिळाली.

गुन्हे शाखेच्या पथकाने लालखडी ते नवसारी रिंगरोड येथे सापळा रचला २० मार्च रोजी संध्याकाळी मिळालेल्या बातमी नुसार नमुद अजिम शेख हा लालखडी ते नवसारी रिंगरोड समोर येवुन उभा राहीला व त्यानंतर लगेच एक इसम लालखडी चौकाकडून ऑटो मध्ये आला व अजिम शेख जवळ उभा राहीला असता गुन्हे शाखेच्या पथकाने अतिशय शिताफीने नमुद दोन्ही इसमास ताब्यात घेतले त्यानंतर दोन पंच व राजपत्रीत अधिकारी यांच्या समक्ष त्यांना त्याचे नाव विचारले असता त्यांनी त्यांची नाव अजिम असद शेख वय ३६ वष. 'रा माहिम दर्ज्याच्या मागे माहिम वेस्ट मुंबई, शेख समीर शेख आमीर वय २५ वर्ष रा. गवळीपुरा अमरावती असे सांगीतले त्यावरूण त्यांची अंगझडती घेतली असता त्यांचे ताब्यातुन ७८ ग्रॅम (एम.डी.) मॅफेडॉन पाउडर कि.अ. ११,७०,०००/- रू व तीन मोबाईल कि.अ. ४६,०००/- रू असा एकूण कि.अ. १२,१६,०००/-रूचा मुद्देमाल जप्त केला.

## उपमहापौर सचिन भेंडे यांनी केली महात्मा ज्योतिबा फुले पुतळ्याची पाहणी

प्रतिनिधी २२ मार्च

**अमरावती:** ११ एप्रिल रोजी महात्मा ज्योतिबा फुले जयंती अमरावती शहरात मोठ्या उत्साहात साजरी केल्या जातात. या निमित्ताने बुधवार १८ मार्च,२०२६ रोजी उपमहापौर सचिन भेंडे यांनी चित्रा चौक येथील महात्मा ज्योतिबा फुले पुतळ्याची पाहणी केली.

या पाहणी दरम्यान युवा स्वाभिमान पक्षाचे गटनेते नाना आमले, नगरसेविका अर्चनाताई पाटील, वंदनाताई मडघे, तसेच



नगरसेवक छोटूभाऊ पाटील, मनोज भेले, राजूभाऊ जटाळे, घनश्यामजी डकरे आणि संदीप कांबळे उपस्थित होते.

उपस्थितांनी महात्मा फुले यांच्या पुतळ्याची आणि परिसराची बारकाईने पाहणी केली. या वेळी अधिकाऱ्यांना सूचित केले की, पुतळा आणि परिसराचे सुशोभीकरण लवकरात लवकर करावे, तसेच परिसर नागरिकांसाठी आकर्षक व सभ्य असे वातावरण निर्माण होईल याची दक्षता घ्यावी.


महात्मा ज्योतिबा फुले हे सामाजिक सुधारक, शिक्षणविषयक क्रांतिकारी आणि स्त्रियांच्या अधिकारांसाठी कार्य करणारे नेते म्हणून ओळखले जातात. त्यांच्या कार्यामुळे समाजातील शिक्षणाचा प्रसार झाला आणि जातीय असमानतेविरोधातील लढा अधिक बळकट झाला. त्यांच्या जयंतीच्या दिवशी अशा कार्यक्रमांचे आयोजन हे त्यांच्या विचारांचा सतत आदर आणि सन्मान राखण्याचे प्रतीक आहे.

## ५ हजार वर्षांपूर्वीची गुहाचित्रे! सातपुड्यातील अंबादेवी परिसरात भारतातील सर्वात प्राचीन वारसा सापडण्याची शक्यता

प्रतिनिधी २२ मार्च

**अमरावती :** सातपुडा पर्वतराजीतील तापी खोऱ्यात महाराष्ट्र-मध्यप्रदेश सीमेवरील अंबादेवी शैलाश्रय परिसरातील गुहाचित्रे सुमारे ३५,००० वर्षे जुनी असू शकतात, असा महत्त्वपूर्ण निष्कर्ष नव्या संशोधनातून समोर आला आहे.

या परिसराचा शोध २००७ मध्ये अमरावतीतील सहा निसर्ग संशोधकांनी लावला होता.





मंगुसाटेव शैलाश्रयातील चित्रांचा अभ्यास करताना संशोधकांना लांब मानेच्या धावत्या पक्ष्याचे चित्र आढळले, जे शहामृगासारखे दिसते. भारतात सुमारे २४,००० ते ४२,००० वर्षांपूर्वी शहामृग अस्तित्वात होते, हे आधीच्या संशोधनातून सिद्ध झाले असल्याने हे चित्र त्या काळातील प्रत्यक्ष निरीक्षणावर आधारित असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

या गुहांमध्ये शिवाथेरियमसारखा जिराफवंशीय प्राणी, लांब तोंडाचा कीटकभक्षी, तसेच भारतीय गेंडा यांचीही चित्रे आढळली आहेत. सर्व चित्रे एकाच शैलीत काढलेली असून त्यावर नंतर कोणतेही बदल दिसत नाहीत, त्यामुळे ती एकाच कालखंडातील असावीत, असा अंदाज संशोधकांनी व्यक्त केला आहे.

या संशोधनाचे कर्णधार डॉ. व्हि. टी. इंगोले असून त्यांच्यासह प्र. सु. हिरुरकर, पद्माकर लाड, डॉ. मनोहर खोडे, शिरीष कुमार पाटील यांनी हा महत्त्वपूर्ण निष्कर्ष मांडला आहे. या विषयावर सविस्तर शोधनिबंध लवकरच प्रकाशित होणार आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट

# खामगाव

## अत्याचाराचा प्रयत्न; भीतीपोटी विष प्राशन

### ♦ तरुणीच्या तक्रारीवरून युवकाविरुद्ध गुन्हा दाखल

प्रतिनिधी २२ मार्च

**खामगाव:** व्हॉट्सॲपद्वारे झालेल्या ओळखीचा गैरफायदा घेत तरुणीला लॉजवर बोलावून तिच्यावर अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. यामुळे पीडित तरुणीने भीतीपोटी विष प्राशन केल्याची घटना घडली. या प्रकरणी पीडित तरुणीने २० मार्च रोजी जळगाव जामोद पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून, पोलिसांनी युवकावर गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मयूर शालिग्राम खिरोडकार (२३) हा आरोपी संबंधित तरुणीचा पाठलाग करत होता, तसेच व्हॉट्सॲपवर सतत संदेश पाठवत होता. तरुणीने संपर्क नाकारल्यानंतर आरोपीकडून स्वतःला इजा करण्याच्या धमक्या देत भेटण्यास भाग पाडण्याचा प्रयत्न केला जात होता. फिर्यादीनुसार, आरोपीने तरुणीला शेगाव येथील एका गेस्ट हाऊसमध्ये नेऊन तिच्यावर जबरदस्ती अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. तरुणीने विरोध केल्यावर आरोपीने तिला व तिच्या कुटुंबीयांना इजा करण्याच्या धमक्या दिल्या. या मानसिक तणावामुळे तरुणीने सोबत आणलेले कीटकनाशक प्राशन केले. यानंतर आरोपीने तिला उपचारासाठी शेगाव येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले व पुढील उपचारासाठी अकोल्याला पाठविण्यात आले.उपचारादरम्यानही तक्रार करू नये, अन्यथा गंभीर परिणाम भोगावे लागतील, अशा धमक्या दिल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. उपचारानंतर प्रकृती सुधारल्यानंतर तरुणीने २० मार्च रोजी पोलिसांकडे तक्रार नोंदविली. त्यावरून पोलिसांनी भारतीय न्यायसंहितेच्या कलम ७४, ७५, ७८ व ३५१ (३) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास ठाणेदार नितीन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलिस उपनिरीक्षक स्नेहा शेडगे करीत आहेत.

## श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळाच्या वतीने पक्ष्यांसाठी जलपात्र वाटप

प्रतिनिधी २२ मार्च



**खामगाव:** उन्हाळ्याचे दिवस लक्ष्यात घेता पक्ष्यांची पाण्यासाठी होणारी भटकंती रोखण्यासाठी जंगलात जाऊन भोपळे आणुन त्यांना कमंडलू आकार देऊन जल पात्राची निर्मिती करून जागतिक चिमणी दिवसाचे औचित्य साधुन दिं २० मार्च २०२६ शुक्रवार रोजी कमंडलु जलपात्र वाटप करण्यात आले पशु पक्षी ही जंगलाची शान व गौरव आहे मानवाच्या प्रमाणे त्यांना ही जगण्याचा अधिकार आहे रखरखत्या उन्हात सावली साठी व चिमुटभर दाण्यासाठी चिमणी व पक्षी यांची भटकंती दिसून येते मात्र वाढते प्रदुषणा मुळे चिमणी व पक्षी संकटात आले आहे या लहानश्या जिवाला वाचवण्यासाठी जागतिक पातळीवर २० मार्च रोजी जागतिक चिमणी दिवस साजरा केला जातो सध्यस्थितीत चिमणी काळाच्या ओघात लुप्त होण्याच्या वाटेवर आहे त्यांच्या विषयी समाजात जागृती निर्माण व्हावी त्यांचे योग्य संवर्धन व्हावे या करीता शहरातील सामाजिक संस्था श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळाचे वतीने दरवर्षी जल पात्र वाटप केले जाते मंडळाचे संस्थापक अध्यक्ष देविदास ऊर्फ मुन्नाभाऊ शर्मा व त्यांचे सहकारी हे मागिल २६ वर्षा पासून तलाव रोड. घाटपुरी रोड. शेगाव रोड आदी ठिकाणी जाऊन जंगली दुधी भोपळे आणुन त्यांना सुकवतात व नंतर त्यांना कमंडलू आकार देऊन जल पात्राची निर्मिती करतात हे कमंडलू ( कुंड्या ) पर्यावरण पूरक व नैसर्गिक असुन पक्ष्यांना पाणी पिण्यासाठी योग्य ठरत आहे. ज्या ठिकाणी पक्ष्यांची संख्या जास्त असेल अश्या ठिकाणी वाटप करण्यात येतात मुन्ना शर्मा यांच्या या उपक्रमाची दखल घेत त्यांना अनेक राष्ट्रीय व राज्यस्तरीय पुरस्कार देवून संम्मानित करण्यात आले आहे. २० मार्च रोजी चिमणी दिवसाचे निमित्त कमंडलु जलपात्र वाटप करण्यात आल्या व जनावरांना पाणी पिण्यासाठी जनुना येथे हौद लावण्यात आला. मंडळाचे संस्थापक अध्यक्ष देविदास शर्मा. विनोद सुकाळे. दिलीप झापर्डे.प्रमोद गायकवाड. रामकृपाल शर्मा. अर्जुन जाधव.लालाजी सांगळे. कृष्णा सुकाळे.रमण अग्रवाल व परीसरातील नागरिकांची उपस्थिती होती, अशी माहिती श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळाच्या वतीने देण्यात आली.

## शहर काँग्रेसच्या वतीने रोजा इफ्तार कार्यक्रम

प्रतिनिधी २२ मार्च

**खामगाव :** शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने १९ मार्च रोजी सायंकाळी मस्तान चौकात रमजान महिन्यानिमित्त रोजा इफ्तारीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या इफ्तार पार्टीत शेकडो हिंदू-मुस्लिम बांधव सहभागी झाले होते.

काँग्रेस पक्षाचे नेते राहुल गांधी यांच्या संकल्पने नुसार जात धरम के जहेर को मिटाने का काम कर रहे है, नफरत के बाजार में मोहब्बत की दुकान खोल रहे है, दिल से दिल को जोड कर एक नया मजबूत भारत निर्माण करने का काम कर रहे है.... ही प्रेरणा घेऊन रमजान महिन्यानिमित्त या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी खामगाव विधानसभा मतदारसंघ समन्वयक ज्ञानेश्वरदादा पाटील यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांनी उपस्थितांना रोजा इफ्तार निमित्त फळफ्रुट, पेंड खजुर



आणि फराळाचे वितरण केले. दरम्यान हिंदु-मुस्लीम बांधवांनी एकमेकांना अलींगन देवुन रमजानच्या शुभेच्छा देत एकता व बंधुभावाचा संदेश दिला. यावेळी हा रमजान आपल्या आयुष्यात सुख, शांती, आणि समृद्धी घेऊन येवो अशी प्रार्थना करण्यात आली.

शहर अध्यक्ष स्वप्निल ठाकरे पाटील, ओबीसी विभागाचे सचिव अजय तायडे, शहर कार्याध्यक्ष किशोरआप्पा भोसले, अल्पसंख्याक शहर अध्यक्ष बबलू पठाण, इब्राहीम खान, गजानन मुळीक, महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेस कमिटी उपाध्यक्षा डॉ.तबस्सुम हुसेन, खामगाव शहर महिला काँग्रेस शहर अध्यक्षा सौ. सरबजीत कौर सलुजा, सौ.स्मिता किशोर भोसले, नगसेविका रूपाली गजानन मुळीक, अल्पसंख्यांक जिल्हा उपाध्यक्ष अस्लम पटेल, नगरसेवक मो.इसा मो.मुसा, नगरसेवक अजिम मोहम्मद पटेल, दादु बेग, शेख उस्मान शेख अब्दुल्लाह, सै.जाफर, मो.इलीयास, जुबेर अन्सारी, जिल्हा संघटन सचिव अतुल सिरसाट, युवक काँग्रेस तालुका अध्यक्ष अचलेश्वर दिपके, जिल्हा काँग्रेस अनुसूचित जाती विभागाचे अध्यक्ष ॲड. अशोक इंगळे, वैभव गायकवाड, अक्षय शंकरवार, इलीयाज अहेमद यांच्यासह शेकडो पदाधिकारी, कार्यकर्ते व मुस्लीम समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

३

# सिटी न्यूज अकोला

रविवार, दि. २२ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## न्यू इंग्लिश हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय द्वारे जिल्हास्तरीय चित्रकला व रंगभरण स्पर्धा

**अकोला:** न्यू इंग्लिश हायस्कूलच्या शतक महोत्सवा निमित्त बाल कलाकारांसाठी शाळेच्या लोकमान्य टिळक सभागृहात १ एप्रिल रोजी सकाळी ८:३० ते १०:३० दरम्यान चित्रकला व रंगभरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. गट 'अ': इयत्ता ३री ते ५ वी (रंगभरण स्पर्धा), गट 'ब': इयत्ता ६ वी ते ८ वी (चित्रकला स्पर्धा). प्रथम पारितोषिक: १००१/-, द्वितीय ५०१/-, तृतीय ३०१/-, दोन प्रोत्साहनपर पारितोषिके तसेच सहभागी विद्यार्थ्याला प्रमाणपत्रङश देण्यात येईल. चित्राचा कागद शाळेमार्फत दिला जाईल, इतर साहित्य विद्यार्थ्यांनी स्वतः आणायचे आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी २८ मार्च पूर्वी ऑनलाइन नोंदणी करणे अनिवार्य आहे. खालील लिंक वर नोंदणी करा. https://formed.svhrt.com/69afc68d12230713179a9fd6 माहितीसाठी आनंद वाघमारे - ९८२२५५७८०४, शशिकांत बांगर - ८४४६७७४८२४, मनोज वाकोडे - ७५८८५०२६२२ यांच्याशी संपर्क साधा.

## त्रिमूर्ती प्रतिष्ठानच्या भीम जयंती उत्सव समिती अध्यक्षपदी स्वप्निल सरकटे



**आकोट:** भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ वी जयंती ग्राम मुंडगाव येथे उत्साहात साजरी होणार एका बैठकीत जयंती कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. अध्यक्षपदी स्वप्नील सरकटे यांची तर कार्याध्यक्ष पदी भाष्कर पोहरकर, सचिव पदी विलास सरकटे सह सचिव पदी शुभम सरकटे, कोषाध्यक्ष पदी सुधीर पळसपगार, तर सदस्य पदी संदीप सरकटे, सतीश भरक्षे, राजकुमार सरकटे, बोधानंद आरख यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. नियोजित बैठकीला त्रिमूर्ती प्रतिष्ठान चे मार्गदर्शक तुळशीराम वानखडे, अध्यक्ष शेषराव सरकटे, उपाध्यक्ष मनीष सरकटे, सचिव सचिन सरकटे सह रंजीत सरकटे बबन सरकटे, केशव सरकटे रामदास सरकटे, हिरा सरकटे, अंकुश सरकटे ,संदिप सरकटे, अविनाश सरकटे सह गावातील बहुसंख्य नागरिकांची उपस्थिती होती.

## ईद उत्साहपूर्ण वातावरणात साजरी झाली

**कुटासा:** पवित्र रमजान महिन्याचे ३० दिवस रोजा (उपवास) पूर्ण केल्यानंतर कुटासा येथे ईद-उल-फितरचा सण मोठ्या उत्साहात आणि शांततेत साजरा करण्यात आला. सकाळपासूनच गावात आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. लहान मुले, युवक तसेच वयोवृद्ध नागरिक पारंपरिक पोशाख परिधान करून जामा मशिदमध्ये दाखल झाले होते. मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव एकत्र येऊन ईदची नमाज अदा करण्यात आली.

नमाजनंतर देशात अमन, शांती आणि बंधुभाव कायम राहावा यासाठी विशेष प्रार्थना करण्यात आल्या. गावात एकात्मतेचा आणि सौहार्दाचा सुंदर संदेश या निमित्ताने देण्यात आला. जामा मशिदीचे इमाम हाफिज मोहोम्मद जुबैर यांनी नमाज अदा करून दिली, आणी हाफीज मोहोम्मद जुबेर यांनी प्रार्थना पठण केली. दोन्ही ठिकाणी शिस्तबद्ध वातावरणात नमाज पार पडली. या दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी दहीहांडा पोलिस प्रशासनाने कडक बंदोबस्त ठेवला होता. ईद-उल-फित्र सण आनंद, उत्साह आणि सामाजिक ऐक्याच्या वातावरणात शांततेत पार पडला.

## 'हिंद- दी-चादर' सांस्कृतिक कार्यक्रमातून श्री गुरु तेग बहादुर यांच्या जाज्वल्य कार्याचे दर्शन

प्रतिनिधी २२ मार्च

**अकोला:** गुरु श्री तेग बहादूर साहेब यांच्या अतुलनीय शौर्य, संघर्ष, बलिदान असा रोमांचकारी इतिहास कलावंतांनी आपल्या नाट्यप्रयोग सादरीकरणातून जागा केला.

श्री गुरु तेग बहादूर साहेब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्ताने महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने हिंद-दी - चादर' नाट्यप्रयोगाच्या माध्यमातून श्री.गुरु तेग बहादूर साहेब यांच्या प्रेरणादायी आयुष्याचा पट रंगभूमीवर साकारण्यात आला. या नाट्यप्रयोगामुळे अकोलेकर रसिकांनी शौर्य, पराक्रम, संघर्ष व बलिदानाची कथा अनुभवायला





मिळाली.

प्रमिलाताई ओक सभागृह येथे नाट्यप्रयोगाची सुरुवात दीप प्रज्वलन व गुरु श्री तेग बहादुर साहेब यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. यावेळी ज्येष्ठ रंगकर्मी प्रमोद पवार, अरविंद विश्वनाथ, मधु जाधव, गुरुमितसिंग गोसल, सुरजीतसिंग अकाली यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

श्रीगुरु तेग बहादुर जी यांनी धर्म स्वातंत्र्य मानवता आणि सहिष्णुतेसाठी आपल्या प्राणांचे बलिदान दिले.त्यांचे जीवनकार्य संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी आहे. म्हणूनच त्यांना हिंद दी चादर (हिंदुस्थानचे रक्षण करणारी ढाल) असेही संबोधले जाते. म्हणूनच श्रीगुरू तेग बहादूर यांच्या शहिदीच्या ३५०व्या वर्षपूर्तीनिमित्त श्रीगुरू तेग बहादूर यांच्या बलिदानाची आठवण ठेवणे, त्यांच्या विचारांचा प्रसार करणे तसेच समाजात एकता, बंधुता आणि आध्यात्मिक मूल्यांचे संवर्धन करणे हा सांस्कृतिक कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

प्रसिद्ध कलावंत राजू पाटोदकर यांच्यासह अनेक दिग्गज कलावंतांनी नाटकात विविध भूमिका वठवल्या. ऐतिहासिक काळाचे दर्शन घडवणारे नेपथ्य, दमदार अभिनय व सादरीकरण प्रभावी होते.

## कौन्सिलच्या नामनिर्देशित सदस्यपदी ॲड. अवीन अग्रवाल यांची निवड

प्रतिनिधी २२ मार्च

**मुर्तीजापुर:** व्यापार, उद्योग आणि कृषी क्षेत्रात अग्रगण्य मानल्या जाणाऱ्या महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चरच्या गव्हर्निंग कौन्सिलमध्ये नामनिर्देशित सदस्य म्हणून मुर्तीजापुर तालुक्यातील प्रसिद्ध उद्योगपती ॲड. अविन अग्रवाल यांची निवड करण्यात आली आहे. ही संस्था सन २०२७ मध्ये आपली शताब्दी पूर्ण करणार आहे. अविन अग्रवाल यांच्या निवडीची माहिती महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष रवींद्र मनगावे यांनी



स्वाक्षरी केलेल्या अधिकृत पत्राद्वारे देण्यात आली. या पत्रात त्यांनी अपेक्षा व्यक्त केली आहे की, रूहाटिया हे गव्हर्निंग कौन्सिलमध्ये नामनिर्देशित सदस्य म्हणून कार्य करताना व्यापार व उद्योग क्षेत्राच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण योगदान देतील. मॅकिया ही संस्था इंडस्ट्रियल पॉलिसी, ट्रेड, गुंतवणूक आणि निर्यात वाढ यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर काम करते. त्यामुळे, या निवडीमुळे अकोला जिल्ह्यातील व्यापार व औद्योगिक क्षेत्राला मोठा फायदा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. उद्योगिक आणि सामाजिक क्षेत्रात सुद्धा एडवोकेट अविन अग्रवाल यांचे योगदान असतात.

## हाता ते कारंजा रमजानपुर रस्ता दुरुस्तीसाठी रस्तारोको

### रस्त्याची खस्ता हालत झाल्यामुळे नागरिक संतप्त

प्रतिनिधी २२ मार्च

**हातरूण:** बाळापूर तालुक्यातील हाता ते कारंजा रमजानपुर रस्ता दुरुस्ती व डांबरीकरण त्वरित व्हावे या मागणी साठी गावक-यांनी रस्ता रोको आंदोलन केले. गावांची समस्या सोडवावी यासाठी प्रशासनाकडे रेटा लावला.

हाता कारंजा रमजानपुर हातरुण रोडचे काम अर्धवट आहे. काही वर्षांपासून रस्ता खराब आहे. गावातील शेकडो विद्यार्थी, व्यापारी, प्रवासी रोज या मार्गाचा वापर करतात. रस्ता चांगला नसल्याने बरेचदा अपघात झाले.



बसेस सुध्दा वेळोवेळी बंद करण्यात येतात. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते. शासन व प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी हाता फाटा येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. माजी जिल्हा परिषद सदस्य संजय बावणे, सरपंच पती किशोर कुचके, श्याम मनसुटे, शिवसेना नेते विजय धर्माळे, गजानन सुलताने, भिमकिरण दामोदर, रवी क्षिरसागर, विजय दामोदर, गजानन देऊळकर, गजानन नंदाने व बहुसंख्य नागरिक सहभागी होते.

सार्वजनिक बांधकाम उपविभाग २ अकोलाचे कनिष्ठ अभियंता पलाश भोयर यांनी रोडचे कामा बाबत वरिष्ठांचे मार्गदर्शन घेऊन उपाय योजना करण्याबाबत पत्र दिल्यानंतर आंदोलन स्थगित केले. पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## अकोलखेड, महाराजस्व अभियान समाधान शिबीर संपन्न

प्रतिनिधी २२ मार्च

**अकोट:** मौजे अकोलखेड येथे महसूल मंडळातील सर्व गावांसाठी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

सदर शिबिराला आमदार प्रकाश भारसाकळे यांची प्रमुख उपस्थितीत होती. तसेच अकोलखेड मंडळातील ग्रामपंचायतींचे सरपंच व उपसरपंच यांची उपस्थिती लाभली.सदर शिबिराचे ठिकाणी तहसील कार्यालय अकोट, उपविभागीय अधिकारी कार्यालय अकोट, पंचायत समिती अकोट , तालुका कृषी अधिकारी अकोट , तालुका आरोग्य अधिकारी अकोट, महावितरण कार्यालय अकोट , पशुसंवर्धन विभाग महिला व बाल विकास विभाग चे अधिकारी व कर्मचारी हजर होते. तसेच पणज मंडळातील सर्व ग्राम महसूल अधिकारी, महसूल सेवक, ग्रामसेवक हजर होते.

सदर शिबिरामध्ये महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या नेतृत्वात महसूल विभागाने नागरिकांसाठी घेतलेले निर्णय व योजनांबाबत तहसिलदार यांनी उपस्थित नागरिकांना माहिती दिली. त्याचप्रमाणे इतर विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांनी सुद्धा त्यांच्या विभागामार्फत नागरिकांसाठी देण्यात येणाऱ्या सेवा व योजनांची माहिती उपस्थित नागरिकांना दिली.समाधान शिबिराचे ठिकाणी उपस्थित नागरिकांना विविध दाखले, सातबारा , प्रमाणपत्र, रेशन कार्ड, फेरफार, यांचे वाटप करण्यात आले. कृषी विभागामार्फत यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत ट्रॅक्टर व ट्रॉलीचे वितरण करण्यात आले. संगायो विभाग तहसील कार्यालय अकोट मार्फत शिबिराचे ठिकाणी उपस्थित दिव्यांग लाभार्थी व इतर लाभार्थी यांची अपडेशन ई केवायसी करण्यात आली तसेच हयातीचे प्रमाणपत्र जमा करून घेण्यात आले. बाल संरक्षण अधिकारी अकोट यांचे मार्फत उपस्थित स्तनदा माता यांना बालसंगोपन किटचे वाटप करण्यात आले.

## अकोटमध्ये 'पूर्व सांज पाडवा' उत्साहात संपन्न

### संस्कृती, कला आणि परंपरेचा सुरेख संगम

वि. प्रतिनिधी २२ मार्च

**अकोट :** मराठी नववर्षाच्या स्वागतासाठी अकोटमध्ये 'पूर्व सांज पाडवा' हा पारंपरिक सांस्कृतिक सोहळा मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात पार पडला. स्थानिक संस्कार भारती समिती, अकोट यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, शिवाजी महाराज चौक येथे या कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले होते.

'सा कला या विमुक्तये' या विचारधारेने प्रेरित संस्कार भारती समितीने स्थानिक कलाकारांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित केला होता. विविध कलाप्रकारांच्या माध्यमातून संस्कृतीचे जतन आणि संवर्धन करण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रांत कार्याध्यक्ष सुधाकरराव अंबुसकर (अकोला) होते, तर प्रांत कार्यकारिणी सदस्य राजाभाऊ धर्माधिकारी (अचलपूर) यांनी मार्गदर्शन केले. व्यासपीठावर सौ. मायाताई धुळे (अध्यक्ष, नगर परिषद अकोट), मोहनराव आसरकर (संघ कार्यप्रमुख, अकोट), पुरुषोत्तमभाऊ चौखंडे (माजी नगराध्यक्ष),





सौ. नयनाताई इंगोले (महिला व बालकल्याण सभापती), सौ. ज्योती राऊत (अध्यक्ष, संस्कार भारती अकोट), डॉ. मनिषा मते (सचिव व माजी नगराध्यक्ष), प्रा. डॉ. अनिल बाभुळकर (उपाध्यक्ष) आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते अश्वारूढ छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन, दीपप्रज्वलन व गुढीपूजनाने झाली. त्यानंतर संस्कार भारतीचे ध्येयगीत सादर करण्यात आले.

सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात हरिष ढवळे यांच्या मार्गदर्शनाखालील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या आरती, गोंधळगीत व समूहगीतांनी झाली. या सादरीकरणाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. तसेच प्रेरणा ढोले यांच्या विद्यार्थिनींनी सादर केलेल्या नृत्याविष्काराने कार्यक्रमात रंगत आणली. यावेळी प्रा. उमेश बाहेकर, विशु विल्यम, ज्योतीताई राऊत, लताताई चिकटे, डॉ. अनिल बाभुळकर, अरुण सांगोळदकर, विजय जितकार, राजकुमार भगत, सुलभा रेळे, स्मिता वनकर, वर्षा मानकर, हर्षा गावंडे, मुकुंद माकोडे आदी कलाकारांनी भावभक्तीपर गीतांचे सादरीकरण करून प्रेक्षकांची मने जिंकली. हरीष ढवळे, विश्वास कुरवाळे व विजय निखाडे यांच्या साथसंगतीमुळे कार्यक्रम अधिकच रंगतदार झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व अतिथी परिचय ज्योती राऊत यांनी करून दिला. स्नेहल अभ्यंकर व सुरेखा माकोडे यांनी बहारदार सूत्रसंचालन केले, तर चंद्रशेखर राऊत यांनी आभार प्रदर्शन केले.

## अंशकालीन स्त्री परिचरांचे मासिक मानधन दुप्पट

**अकोला:** आरोग्य उपकेंद्रांमध्ये स्वच्छता राखणे, गृहभेटी देणे, गरोदर मातांना गोळ्यांचे वाटप करणे, गरोदर मातांसाठी आरोग्य शिबिरांचे आयोजन करणे अशा अनेक महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडणाऱ्या अंशकालीन स्त्री परिचारांचे मासिक मानधन दुपट्ट करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय महायुती सरकारने घेतला आहे. यामुळे ३ हजारांचे मासिक मानधन थेट ६ हजार होणार असून स्त्री परिचरांना याचा लाभ मिळणार आहे. या निर्णयामुळे आरोग्य सेवा अधिक बळकट होण्यासोबतच रुग्णांसाठी दिवसरात्र काम करणाऱ्या स्त्री परिचरांच्या कार्याचा यथोचित सन्मान होणार आहे, असा विश्वास सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी व्यक्त केला आहे. दि. १ एप्रिल २०२६ पासूनच या निर्णयाची अंमलबजावणी देखील केली जाणार आहे.

## अखेर 'साई' वर पडला यंत्रणेचा 'प्रकाश'

### आयपीएस निखिल पाटील यांच्या पथकाने घेतली झाडाझडती

प्रतिनिधी २२ मार्च

**तेल्हारा:** गाडेगाव मार्गावरील एका मंगल कार्यालयात साई क्रीडा व मनोरंजन मंडळाच्या नावावर सुरू असलेल्या क्लबची अकोटचे एसडीपीओ आयपीएस निखिल पाटील यांच्या पथकाने झाडाझडती घेतली. यावेळी तेथे तब्बल ३० ते ४० जणांच्या जवळपास लोक आढळले असल्याची प्राथमिक माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. शहर पोलिसांच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

गाडेगाव मार्गावर जगन्नाथ मंगल कार्यालय येथे साई क्रीडा व मनोरंजन मंडळाच्या वतीने विविध उपक्रम राबविणे सुरू असून तसा फलक सुद्धा मंडळाच्या वतीने दर्शनी ठिकाणी लावण्यात आला आहे. त्यामध्ये रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी, खेळ, स्पर्धा, बॅडमिंटन, 'कार्ड रूम' च्या परवानगी बाबत यंत्रणेला साशंकता आहे.

याठिकाणी रमी, प्लेइंग कार्ड यासाठी लागणाऱ्या 'कार्ड रुम' करिता मात्र कुठल्याही प्रकारची परवानगीच नसल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

तर हे सुरू करण्यासाठी सर्वात आधी संबंधित पोलिस ठाण्याकडून स्थळ निरीक्षण अहवाल ही प्रक्रिया पार पाडावी लागते ती सुद्धा पार पाडली नसल्याची धक्कादायक माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. परिणामी याठिकाणी सुरू असलेली 'कार्ड रूम' ची पाहणी केली. याठिकाणी ३० ते ४० जण आढळले असल्याची माहिती मिळाली.

> येथील मनोरंजन मंडळाची झडती घेण्यात आली आहे. याठिकाणी कुठल्याही प्रकारची रोख रक्कम आढळली नाही. शनिवारी सकाळी मनोरंजन मंडळाची सर्व कागदपत्रे व परवान्याची प्रत मागविण्यात आली आहे. या सर्व कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येणार.
>
> **निखिल पाटील,**
> एसडीपीओ अकोट

## वणी वारुळा येथे महिला शक्तीचा सत्कार

प्रतिनिधी २२ मार्च

**अकोट:** वणी वारुळा येथे पत्रकार राजकुमार वानखडे यांचे वडील वामनराव वानखडे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ रेडिओ श्रोता संमेलन व नारी शक्ती एकता संघर्ष फाऊंडेशन च्या वतीने पदाधिकारी व कार्यकर्ते, महिला व सामाजिक कार्यकर्ते, आकाशवाणी उदघोषक, आकाशवाणी अधिकारी, पोलिस अधिकारी, पत्रकार, अधिकारी यांचा सत्कार करण्यात येणार आहे. २२मार्च रोजी महिला दिनानिमित्त महिलाचा सत्कार तसेच रेडिओ श्रोता संमेलन व आलेल्या पाहुण्यांचा व रेडिओ श्रोत्यांचा सत्कार पो.निरीक्षक किशोर जुनघरे व पो. निरीक्षक अमोल माळवे, मुंबई विविध भारतीचे अधिकारी डॉ. संतोष जाधव, मुंबई रेडिओचे संघ संस्थापक चंदन, विठ्ठल ढोबळे, कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीकांत फड, उदघोषक विकास पल्हाडे, उदघोषीका शिलाताई घरडे, उदघोषक संदिप घरडे, उदघोषक अनिल नरवाडे, पुणे येथील प्रसिद्ध डॉ.माणिक नेसनेस्कार, नारी शक्ती च्या अध्यक्षा संगीता प्रभे, उपाध्यक्ष हमिदा बि शेख अख्तर, सचिव चंदा प्रभे, सहसचिव विद्या गावंडे, कोषाध्यक्ष कविता वानखडे, सह कोषाध्यक्ष उज्वला डोबाळे, सदस्या सविता भागवतकर, शुभांगी मोहिते, छायाताई धोंडेकर, अंतकला जुमळे, सह असंख्य कार्यकर्ते व महिला तसेच रेडिओ श्रोता यांचा सत्कार करण्यात येणार आहे.तरी या आयोजित कार्यक्रमाला जास्तीत जास्त रेडिओ श्रोता व नारी शक्ती एकता संघर्ष फाऊंडेशन च्या महिलांनी आवर्जून उपस्थित राहावे असे आवाहन केले आहे.

## रमजान ईद निमित्त हिंदू मुस्लिम बांधवांचे एकोप्याचे दर्शन

प्रतिनिधी २२ मार्च

**मुर्तीजापुर:** शहरातील स्टेशन परिसरात रमजान ईद निमित्त हिंदू मुस्लिम बांधवांची एकोप्याचे दर्शन घडले. शाकंबरी प्रतिष्ठान संस्थेचे अध्यक्ष व संत गाडगे महाराज स्वच्छता अभियान प्रमुख सतीश अग्रवाल यांच्या संकल्पनेने ईद निमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

रमजान ईद निमित्त मुस्लिम बांधव मोठ्या प्रमाणात तीस दिवस रोजे ठेवून इच्छा दिवशी विशेष नमाज अदा करतात यानिमित्ताने स्टेशन परिसरात मोठ्या उत्साहाच्या वातावरणात हिंदू बांधवांनी मुस्लिम बांधवांना ईदी चे शुभेच्छा दिल्या व त्यांचे स्वागत केले.



मशीदचे अध्यक्ष एड. शेख नसीर मौलाना जाहेद आलम मन्सूर राही यांच्या पुढाकाराने हिंदू बांधवांना दुपट्टे देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. ज्येष्ठ पत्रकार मनोहर पाठक, प्रा. अविनाश बेलाडकर, नगरसेवक सचिन देशमुख, राहुल पाटील, सदाशिव शेळके, दीपक अग्रवाल, प्रा. दीपक जोशी, अन्वर खान, नगरपरिषद उपाध्यक्ष रोहित अवलवार, त्रिलोक महाराज, रवी माडकर , हाजी मीरसाहेब, आरिफ ठेकेदार, आसिफ ठेकेदार, सय्यद जुनेद, सय्यद राजीम मोहम्मद शरीक ,निसार अहमद, मुजीब खान, कलीम खान, शे अजहर, शेख रफिक, मोहम्मद इमरान ,युनूस खान ,अमीर खान, शेख परवेस ,शेख अलतमश , शेख शादाब शेख इरफान इंजिनियर शेख फारुख शेख जुबेर व इतर मुस्लिम बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन अन्वर खान यांनी केले.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
रविवार, दि. २२ मार्च २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# भरधाव आयचरचा कहर; ऑटोला भीषण धडक, 16 जखमी

प्रतिनिधी २२ मार्च

**उमरखेड :** पोटाची खळगी भरण्यासाठी हळद वेचण्यासाठी शेतात जात असलेल्या शेतमजुरांच्या ऑटोला भरधाव वेगाने येणाऱ्या आयचरने जोरदार धडक दिल्याची घटना रविवारी सकाळी घडली. या अपघातात १४ महिला मजुरांसह एकूण १६ जण जखमी झाले असून त्यापैकी ७ जण गंभीर आहेत.

ही घटना सकाळी सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास उमरखेड-ढाणकी मार्गावरील एमआयडीसीजवळ घडली. भरधाव येणाऱ्या आयचर (क्र. एमएच ४० बीएल ५९८०) ने प्रथम समोरील मोटरसायकलला धडक दिली आणि त्यानंतर शेतमजूर प्रवास करत असलेल्या ऑटोला (क्र. सीजी ०४ एमटी १२२६) जोरदार धडक दिली.



या अपघातात मोटरसायकलस्वार लक्ष्मण किसन गायकवाड (रा. विडूळ), जिजाबाई विठ्ठल धुळेकर (वय ६५), वर्षा सुरेश गायकवाड (वय ३७), लक्ष्मी जयराम दिवेकर (वय ६५), सुनिता मुकेश दिवेकर (वय ३७), लता प्रभाकर शिंदे (वय ४०) आणि अर्चना नितीन जगदाळे (वय ३७, सर्व रा. उमरखेड) हे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना पुढील उपचारासाठी नांदेड व वर्धा येथील रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

तसेच ऑटो चालक गजानन हिरामन हांडे (वय ४१, रा. विडूळ) यांच्यासह प्रतीभा गजानन जाधव (वय ३५), संगीता गणेश जेरे (वय ४०), माया सिद्धार्थ गावंडे (वय ३३), रश्मी राजू दिवेकर (वय ३०), शिला संजय दिवेकर (वय ४९), धृपता पंजाब दवणे (वय ५५), सारिका ईश्वर जगताप (वय २५) आणि विद्या दिगंबर इंगोले (वय ३७, सर्व रा. उमरखेड) हे जखमी असून त्यांच्यावर उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

अपघातानंतर संतप्त नागरिकांनी आयचर चालकाला पकडून त्याला चोप दिला. त्यानंतर तो वाहनासह पळून जाण्याचा प्रयत्न करत असताना विडूळ येथील नागरिकांनी त्याला अडवून पोलिसांच्या ताब्यात दिले.

घटनेची माहिती मिळताच पोलीस उपनिरीक्षक योगेश जाधव व जमादार अमित नोळे यांनी घटनास्थळी धाव घेऊन जखमींना तत्काळ रुग्णालयात दाखल केले. पोलिसांनी आयचर वाहन व चालक ताब्यात घेतला असून पुढील तपास सुरू आहे.

# धावत्या ट्रॅव्हल्सला आग; १० प्रवासी बचावले

प्रतिनिधी २२ मार्च






**यवतमाळ :** वर्ध्याहून नांदेडकडे निघालेल्या मिनी ट्रॅव्हल्सला यवतमाळ येथील विमानतळ परिसरात शनिवारी (२१ मार्च) दुपारी सुमारे २.४५ वाजता अचानक आग लागली. या वाहनात सुमारे १० प्रवासी प्रवास करत होते. वाहनातून धूर निघत असल्याचे चालकाच्या लक्षात येताच त्याने प्रसंगावधान राखत तातडीने वाहन रस्त्याच्या कडेला उभे केले आणि सर्व प्रवाशांना सुरक्षितपणे खाली उतरवले. त्यामुळे मोठी जीवितहानी टळली.

काही क्षणांतच आगीने भीषण रूप धारण करत संपूर्ण ट्रॅव्हल्स जळून खाक झाली. घटनेची माहिती मिळताच यवतमाळ अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेतली आणि पाण्याचा मारा करून आग आटोक्यात आणली. मात्र तोपर्यंत वाहन पूर्णपणे जळून खाक झाले होते. या कारवाईत चालक रमेश चौधरी, बिपिन रहांगडाले, रवी तायडे तसेच अग्निशमन दलातील जवान रोहित इमलीकर, राजू इंगळे, शुभम गुजरे, धनराज मारबते, अजय गोडे, हेमंत डोंगरे, निलेश बिसेन आणि अनुराग फुरसुले यांनी मोलाची भूमिका बजावली. या आगीत प्रवाशांचे सर्व साहित्य जळून मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. प्राथमिक माहितीनुसार, शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत असून पुढील तपास सुरू आहे.

# शिरे लेआऊटमध्ये देहव्यवसाय; महिलेस अटक

प्रतिनिधी २२ मार्च

**यवतमाळ :** शहरातील शिरे लेआऊट परिसरात सुरू असलेल्या कथित देहव्यवसायावर अवधुतवाडी पोलिसांनी सापळा रचून कारवाई करत एका महिलेस अटक केली. ही कारवाई शुक्रवारी (दि. २० मार्च) दुपारच्या सुमारास करण्यात आली असून, पोलिसांनी रोख रक्कम, मोबाईल फोन व अन्य साहित्य असा एकूण ११ हजार ५३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित महिला आपल्या भाड्याच्या घरातून महिलांकडून अनैतिक व्यवसाय चालवत असल्याची खात्रीलायक माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी बनावट ग्राहक पाठवून सापळा रचला. ठरल्याप्रमाणे ग्राहकाने संबंधित महिलेशी संपर्क साधून देहव्यवसायासाठी मुलीची मागणी केली. त्यावर १५०० रुपये दर ठरविण्यात आला.

व्यवहार निश्चित झाल्यानंतर बनावट ग्राहकाने पोलिसांनी दिलेल्या खुणेप्रमाणे संकेत दिला. त्यानंतर दबा धरून बसलेल्या पोलिस पथकाने तत्काळ घरात प्रवेश करून छापा टाकला. या वेळी आरोपी महिला तसेच एक अन्य महिला घटनास्थळी आढळून आली.

झडतीदरम्यान आरोपी महिलेच्या ताब्यातून बनावट ग्राहकाकडून देण्यात आलेली १५०० रुपयांची रक्कम, एक मोबाईल फोन तसेच अन्य साहित्य असा एकूण ११,५३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. घटनास्थळी आढळलेल्या महिलेकडून विचारपूस केली असता ती प्रौढ असल्याचे स्पष्ट झाले. तिचे बयान नोंदवून तिला सोडण्यात आले असल्याचे पोलिसांनी सांगितले.

प्राथमिक तपासात आरोपी महिला ही इतर महिलांना प्रवृत्त करून स्वतःच्या फायद्यासाठी देहव्यवसाय चालवत असल्याचे निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी तिच्याविरुद्ध अनैतिक व्यापार प्रतिबंधक अधिनियम १९५६ च्या कलम ३, ४ व ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलिस उपनिरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने केली असून पुढील तपास सुरू आहे. शहरात अशा प्रकारच्या अनैतिक व्यवसायांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही पोलिसांनी दिला आहे.

# आर्णी येथे मोफत डोळे निदान मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

प्रतिनिधी २२ मार्च

**आर्णी :** जिल्हा अंधत्व नियंत्रण समिती यवतमाळ, बळीराजा चेतना अभियान द्वारे तालुका आरोग्य अधिकारी , ग्रामीण रुग्णालय आर्णी व ग्राम पंचायत कार्यालय लोणबेहळ अंतर्गत मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. वामनराव गावंडे, स्व. रामदासजी बंडे, स्व. प्रयागबई बंडे, स्व. सिमाताई राऊत, आणि स्व.सावित्रीबाई जाधव यांच्या स्मृती प्रित्यर्थ सामाजिक कार्यकर्ते चंदन राठोड व चंद्रकांत बंडे यांनी भव्य मोफत डोळे निदान मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरचे 27 मार्च रोज शुक्रवारी सकाळी १० ते २ वाजेपर्यंत प्राथमिक आरोग्य केंद्र लोणबेहळ या ठिकाणी आयोजित केले असून अबाल वृद्धांनी या शिबिराचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

आयोजक चंदन राठोड यांनी गेल्या 23 वर्षापासून इच्छाशक्ती व सर्वांच्या सहकार्याने हा उपक्रम राबवित आहे. या शिबिराचे उद्घाटन डॉ.रमा बाजोरिया डॉ. सुनील भवरे, प्रल्हादराव इंगळे, भिकमचंद लोया व राजू इंगोले यांच्या शुभ हस्ते डॉ.कृष्णी राठोड,राजेश श्रीवास,श्रीराम राऊत, सुनील चोरडिया यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. शिबिराच्या अध्यक्षस्थानी लोणबेहळ येथील ग्रामपंचायत प्रशासक मोनिकाताई सुनील राठोड हे राहणार असून यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून तहसीलदार वैशाख वाहुरवाघ, ठाणेदार निलेश सुरडकर, आर.आर. खरोडे, नितीन वानखडे, डॉ.आरती नाटकर, विशाबंर जाधव, प्रकाश बुटले, यांची प्रमुख उपस्थित राहणार आहे. या शिबिरा दरम्यान डॉ. स्वप्नील तायडे डॉ. प्रतिक तायडे, प्रज्ञा खैरे हे डोळे निदान व मोतीबिंदू रुग्णांची तपासणी करणार आहे. या दरम्यान गजानन ऑप्टिकल यवतमाळ यांच्या कडून रुग्णांना अल्प दरात चष्मे देण्यात येणार आहे. सदर शिबिराच्या कार्यक्रमात मोतीबिंदू असलेल्या रुग्णांची निवड करण्यात येणार आहे असून शिबिरा दरम्यान बळीराजा चेतना अभियानांतर्गत शेतकऱ्यांना शेती विषयक मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तरी ग्रामीण भागातील गोर गरीब अबाल वृद्धांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन गावकरी मंडळी, ग्राम पंचायत लोणबेहळ यांच्या वतीने आयोजक चंदन राठोड, चंद्रकांत बंडे व राजू इंगोले यांनी केले आहे.

# १५० मुख्याध्यापकांनी घेतले समावेशित शिक्षणाचे धडे

प्रतिनिधी २२ मार्च

**यवतमाळ :** समग्र शिक्षा शिक्षण विभाग पंचायत समिती यवतमाळ यांच्या विद्यमाने समावेशित शिक्षण २०२५- २६ अंतर्गत यवतमाळ तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेच्या सर्व मुख्याध्यापकांचे समावेशित शिक्षण अंतर्गत एक दिवसीय मुख्याध्यापक प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन दिनांक २० मार्च २०२६ ला जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यवतमाळ येथे करण्यात आले होते. या मुख्याध्यापक प्रशिक्षणात तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेतील १५० मुख्याध्यापकांनी सहभाग नोंदविला.



दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सोयीसुविधा, सामाजिक सुरक्षा, समावेशित शिक्षणाचे संकल्पना, दिव्यांगत्वाचे प्रकार व प्रतिबंधक उपाय, प्रत्येक दिव्यांग मुल शिकले पाहिजे. यासाठी एकदिवसीय मुख्याध्यापक प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.या समावेशित शिक्षण प्रशिक्षणाचे उद्घाटन डायटचे प्राचार्य डॉ. रमेश राऊत यांच्या हस्ते करण्यात आले .तर प्रमुख अतिथी तथा मार्गदर्शक म्हणून गटशिक्षणाधिकारी पोपेश्वर भोयर,केंद्रप्रमुख दत्तात्रय गावंडे, निशांत परगणे, सुदर्शन बोरकर प्रीती ओरके आदींची उपस्थिती होती. या प्रशिक्षणाचे प्रस्ताविक सुदर्शन बोरकर यांनी केले.

याप्रसंगी गटशिक्षणाधिकारी पोपेश्वर भोयर यांनी प्रत्येक दिव्यांग मुल शिकू शकते. प्रत्येक मूल हे राष्ट्राची संपत्ती आहे. व त्यांचे रक्षण करणे प्रत्येक शिक्षकांचे कर्तव्य आहे असे महत्त्वपूर्ण विचार त्यांनी व्यक्त केले. यावेळी केंद्र प्रमुख दत्तात्रय गावंडे यांनी दिव्यांगांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देऊन त्यांना आधार देणे गरजेचे आहे. असे ते म्हणाले.तालुक्यातून जिल्हा परिषद शाळेतील १५० मुख्याध्यापकांनी समावेशित शिक्षणाचे धडे घेतले.या प्रशिक्षणाच्या आयोजनासाठी सुदर्शन बोरकर, प्रिती ओरके, विजय पातोडे, संजय पातोडे, वर्षा भूतनेर, निशांत परगणे, वैशाली खरवडे, वेदज्योती बोरकर यांनी पुढाकार घेतला.

याप्रसंगी विशेष सहकार्य अशोक राऊत, सारंग भटुरकर, कैलास गव्हाणकर, स्वप्निल फुलमाळी, शरद घारोड, राजहंस मेंढे, महेश जनबंधू, सुनिल राठोड, मिना सांगळे, नदीम पटेल, अनिल जयस्वाल, विजय ढाले, अनिल खासरे, संजय काळे, अविनाश बनसोड, मिलिंद देशपांडे,अनिता वऱ्हाडे, मिनाक्षी लोखंडे, विनोद शिंदे, नम्रता बिरे,मोरेश्वर पुंडशास्त्री, संजय वनकर आदि मुख्याध्यापकांचे सहकार्य लाभले. यावेळी उपस्थितांचे आभार प्रिती ओरके यांनी मानले.

# निसर्ग पर्यटनाची क्रांती; जांब येथे ३७ किलोमीटरच्या सफारी मार्ग

प्रतिनिधी २२ मार्च

**यवतमाळ :** पांढरकवडा प्रादेशिक वनविभागाने निसर्ग पर्यटनाला नवीन दिशा देत जांब (हेटी) येथे ३७ किलोमीटर लांबीचा सफारी मार्ग विकसित केला आहे. २१ मार्च २०२६ रोजी आमदार राजू तोडसाम यांच्या हस्ते उद्घाटन झाले. या उपक्रमामुळे स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत.



सफारी उद्घाटन सोहळ्यात यवतमाळ वनवृत्ताचे मुख्य वनसंरक्षक डॉ. किशोर मानकर, उपवनसंरक्षक यशवंत बहाळे, सहायक वनसंरक्षक विशाल चव्हाण, वनपरिक्षेत्र अधिकारी, जांब सरपंच रमेश सिडाम, संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान भव्य प्रवेशद्वाराचे फित कापून उद्घाटन करण्यात आले आणि पर्यटकांसाठी सज्ज वाहनांना हिरवा झेंडा दाखवून सफारीची सुरुवात झाली. सफारी मार्गाच्या हद्दीत टिपेश्वर अभयारण्यासह पांढरकवडा वनविभागाची विस्तृत जंगलरचना असून, वाघ, बिबट्या, रानकुत्रे, अस्वल, लांडगा, कोल्हा, नीलगाय, चितळ यांसारखे वन्यजीव आढळतात. सहा कृत्रिम पाणवठ्यांद्वारे वन्यजीवांना पाणी उपलब्ध करून दिले गेले आहे. पर्यटकांसाठी २० नोंदणीकृत जिप्सी वाहन, मार्गदर्शक शुल्क ४०० रुपये, प्रति वाहन ३००० रुपये व शासकीय शुल्क १००० रुपये निश्चित करण्यात आले. आठवड्यातील गुरुवारी सफारी बंद राहणार आहे. सकाळी ६ ते १० व दुपारी २ ते ६ या वेळेत प्रवेश मिळेल. राजू तोडसाम यांनी पावसाळ्यातील रस्त्यांची दुरुस्ती, वन्यजीवांसाठी पाण्याची सुविधा व स्थानिक आदिवासींच्या रोजगार वाढीबाबत आश्वासन दिले. या प्रकल्पामुळे सुमारे ५० युवक वाहनचालक, मार्गदर्शक व गेट व्यवस्थापन अशा विविध क्षेत्रांत रोजगारात सामील होतील, तर स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळणार आहे.

# स्मशानभूमीतील दहन शेडच्या कामाचे भूमिपूजन

प्रतिनिधी २२ मार्च

**उमरखेड :** तालुक्यातील बाळदी गावात अखेर स्मशानभूमीतील दहन शेडच्या कामाची सुरुवात झाली आहे. २० मार्च २०२६ रोजी गावातील सरपंच डॉ. भगवान बोरकर यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले.



गावातील स्मशानभूमीमध्ये दहन शेड न असल्यामुळे पावसाळ्यात मृतदेहांच्या अंत्यसंस्कारासाठी नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला.

2021 मध्ये ग्रामपंचायतीने जागेची मागणी केली होती. त्यानंतर 2022 मध्ये तलाठी, वनविभाग आणि आरोग्य विभागांचे अहवाल मागवून शासनाकडे पाठवले होते.

2023 मध्ये मे महिन्यात शासनाकडून मोजणी केली गेली आणि 2024 मध्ये सर्व प्रक्रिया पूर्ण करून 2025 मध्ये ग्रामपंचायतीला जागेची मोजमाप सुपूर्त केली. डिसेंबर 2024 मध्ये वित्त आयोगातून निधी मिळवून जाळीचे काम सुरू झाले.

भूमिपूजन सोहळ्यात सरपंच डॉ. भगवान बोरकर, उपसरपंच अंकुश मिराशे, माजी सरपंच प्रदीप शिरडकर, माजी उपसरपंच अरविंद हरण, माजी उपसरपंच साहेबराव पाटील मिराशे, सोसायटी अध्यक्ष भाऊराव वटाणे, तंटामुक्ती अध्यक्ष अनिल बोंद्रे, कोतवाल शामराव पोटे, रोजगार सेवक गणपत ठोके, निर्गुण मिराशे, ज्येष्ठ नागरिक संभाजी चिरडे, किशोर दुधे, देवबन गोस्वामी, बळीराम वानखेडे, अनिल चव्हाण, विनोद टिपरे, प्रवीण इंगळे, संजय बलखंडे, अतिश वटाणे व इतर ग्रामस्थ उपस्थित होते.

या कामामुळे गावातील नागरिकांना अंत्यसंस्कारासाठी अधिक सोयीस्कर वातावरण मिळणार आहे.

# आर्णीमध्ये रमजान ईद; ईदगाहवर सामूहिक नमाज

प्रतिनिधी २२ मार्च

**आर्णी :** पवित्र रमजान महिन्याची सांगता आर्णी शहरात उत्साहपूर्ण धार्मिक वातावरणात झाली. ईद-उल-फित्र निमित्त आर्णी येथील बाबा कंबलपोष दर्गा येथील ईदगाह मैदानावर हजारो मुस्लिम बांधवांनी एकत्र येऊन विशेष सामूहिक नमाज अदा केली.

सकाळपासूनच पारंपरिक पोशाखात सजलेले बांधव मौलानांच्या मार्गदर्शनाखाली शिस्तबद्ध पद्धतीने नमाजसाठी उपस्थित होते. नमाज संपल्यानंतर एकमेकांना गळाभेट देत बंधुभाव, प्रेम आणि सामाजिक ऐक्याचा सुंदर संदेश दिला. लहानापासून मोठ्यांपर्यंत सर्वांमध्ये आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले.





ईदच्या शुभेच्छा देण्यासाठी शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. पोलीस विभागाने कडक बंदोबस्त ठेवून कार्यक्रम सुरळीत आणि शांततेत पार पडण्याची दक्षता घेतली. पोलीस निरीक्षक निलेश सुरडकर यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक व्यवस्थापन आणि सुरक्षा सुनिश्चित करण्यात आली.

आर्णीत साजरी झालेली ईद केवळ धार्मिक पर्व न राहता सामाजिक ऐक्य, प्रेम आणि बंधूभावाचा संदेश देणारा उत्सव ठरला.

कार्यक्रमाद्वारे शहरातील नागरिकांमध्ये सौहार्दाची भावना वृद्धिंगत झाली आणि रमजान महिन्याच्या पवित्रतेचा आदर स्पष्टपणे दिसून आला.

# माथार्जुनमध्ये ईद-उल-फितरचा उत्सव



प्रतिनिधी २२ मार्च

**झरी जामणी :** तालुक्यातील माथार्जुन येथे ईद-उल-फितर निमित्त ईदगाह मैदानावर मोठ्या उत्साहात नमाज अदा करण्यात आली. पवित्र रमजान महिन्यानंतर साजऱ्या होणाऱ्या या सणामुळे संपूर्ण गावात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. या प्रसंगी मुस्लिम बांधवांनी सर्व समाजातील मान्यवरांना आमंत्रित करून सामाजिक सलोखा आणि बंधुभावाचे उत्कृष्ट उदाहरण सादर केले. या उपक्रमामुळे गावात आपुलकीचे वातावरण निर्माण झाले असून एकात्मतेचा संदेश अधिक दृढ झाला आहे. कार्यक्रमास गावाचे सरपंच रवींद्र कायतावर, बीट जमादार सचिन गाडगे तसेच सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार योगेश मडावी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी मुस्लिम बांधवांचे आभार मानत ईदच्या शुभेच्छा दिल्या.

नमाजानंतर सर्वांनी एकमेकांना आलिंगन देत “ईद मुबारक” म्हणत आनंद साजरा केला. त्यानंतर शिरखुरमाचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे गावातील सामाजिक एकता आणि बंधुभाव अधिक बळकट झाल्याचे चित्र दिसून आले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
रविवार दि. २२ मार्च २०२६
http://epaper.citynewssuperfast.com



# अतांत्रिक कामामुळे... जिल्ह्यात कृत्रिम जलसंकट!

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशीम जिल्ह्यात सन २००२ नंतर २४ वर्षांनी सन २०२५ मध्ये गतवर्षी सर्वाधिक सरासरी १२३ टक्के पाऊस झाला. तरी सुद्धा ६ शहरांसह आणि ३० टक्के खेडे गावे जल संकटात असून जवळपास ६० टक्केपेक्षा अधिक नागरीक जलसंकटाचा सामना करीत आहे. येत्या दोन महिन्यात हे संकट अधिक गंभीर स्वरूपाचे होत जाईल. यास दोषी कोण ? असा प्रश्न जागतिक जल दिनाच्या पार्श्वभूमीवर जलहक्क चळवळीचे कार्यकर्ते सचिन कुळकर्णी यांनी प्रसिद्धी पत्रकार द्वारे केला आहे.

जिल्ह्यातील भूजल पातळी १.५२ मीटर पेक्षा अधिक खालावलेली आहे. दोन मध्यम प्रकल्पा सहित ७७ जलाशयामध्ये केवळ एकूण ३० टक्के जलसाठा मार्च महिन्याच्या तिसऱ्या पंधरवड्यात



***जलतारांचा लाभ कुठे आहे ?**
***पाझरचे साठवण मध्ये रूपांतरणवर प्रश्नचिन्ह**
***भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा कुठे ?**

उरलेला आहे. जल जीवन मिशन अंतर्गत ५७२ पैकी १८८ योजना पूर्ण झाल्या. १८० पैकी ७५ टक्के ते ८० टक्के मध्ये आहे.महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अंतर्गत २२ पाणी पुरवठा पैकी १८ योजनेतून पाणीपुरवठा होऊन ५० पैकी ४६ आवश्यकतेनुसार पाणी दिल्या जात आहे. चार गावाच्या चार योजना अद्याप अपूर्ण आहे. आडातच नसल्याने पोहऱ्यात कुठून येईल ? अशी स्थिती हर घर जल ची झालेली आहे.६ शहरांत आणि ३० टक्के खेडे गावातील जवळपास ६० टक्केपेक्षा अधिक नागरीक जल संकटाचा सामना करीत आहे. येत्या दोन महिन्यात हे संकट अधिक गंभीर स्वरूपाचे होत जाईल. याला सर्वस्वी कारणीभूत जिल्हा प्रशासन व भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा आहे.

### जलसंकटाची कारणे

जि. प. ने केलेले सन २०२१ ते २०२३ मध्ये ६४ अतांत्रिक पाझर तलावाचे साठवण तलावात रूपांतरण, गतवर्षी ४० हजार जलतारा मोहिमेचे प्रयोग, अमर्याद विहिरी आणि विंधन विहिरी, नियोजन नसलेली नळ प्रणाली यामुळे जिल्ह्याच्या भूजलाची वाट लागली आहे. केंद्रीय भूजल बोर्ड, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणाने काय कामे करतात असा प्रश्न निर्माण झालेला आहे.



### जलताराचे फलीतकाय ?

गतवर्षी जिल्हा प्रशासनाने 'रन ऑफ झोन' असलेल्या वाशीम जिल्ह्यात सर्व प्रशासन वेठीस धरून जलतारा मोहीम राबवली. 'मोठ्या प्रकल्पाएवढे पाणी जमिनीत मुरवू' हा दावा करणाऱ्या प्रशासनाकडे मात्र एक वर्ष होऊन या ४० हजार शोषखड्ड्यांच्या यशाचा किंवा अपयशाचा कोणताही 'थर्ड पार्टी ऑडिट' अहवाल उपलब्ध का नाही ? आता त्याचे दुष्परिणाम दिसायला सुरुवात झाली आहे. जिल्हा प्रशासनाने केलेले अहंकारी आश्वासने कुठे गेली ?

### तांत्रिकतेचे काय ?

तांत्रिक अनुमती नसताना अशा कृतीने नैसर्गिक 'ड्रेनेज पॅटर्न' बदलतो. अशाने मातीचा नैसर्गिक 'गाळण प्रक्रिया' पूर्णपणे टाळली जाते, ज्यामुळे रसायने थेट पिण्याच्या पाण्याच्या साठ्यात पोहोचतात. एका ठिकाणाहून थेट भूगर्भात प्रवेश करते, तेव्हा त्याला 'पॉईंट सोर्स पॉल्युशन' म्हणतात. हे संपूर्ण परिसरातील विहिरींचे पाणी दूषित करण्यासाठी पुरेसे असते. पॉईंट सोर्स पॉल्युशन होत आहे का ? हे पाहण्यासाठी आत्ताच प्रशासनाने युद्धस्तरावर जल रासायनिक तपासण्या कराव्या. वाशीम जिल्ह्यात वाढलेले मूत्रपिंड व कर्करोगाचे रुग्ण पाहता या गंभीर परिस्थितीकडे वरिष्ठांनी लक्ष देण्याची आवश्यकता.

कृषी अधिकाऱ्याची वसुलीवरच नजर,


# कामाच्या वेळी कर्मचारी गैरहजर !

**कारंजा तालुका कृषी कार्यालयाचा भोंगळ कारभार**




● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

कारंजा तालुक्यामध्ये सर्व शासकीय कार्यालयामध्ये आज कोणाचाही अंकुश राहीला नाही.याचाच प्रत्यय कारंजा तालुका कृषी अधिकारी कार्यालयामध्ये पहावयास मिळाला अधिकारी व कर्मचारी कधीही वेळेवर येत नसल्याची माहिती समोर आली. सविस्तर माहिती अशी की सध्या कारंजा शहरामध्ये कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कर्मचारी व अधिकारी वेळेवर कार्यालयात येत नसून मनमानी कारभार सुरू आहे.असाच प्रकार कारंजा तालुका कृषी अधिकारी कार्यालयात पाहावयास मिळाला.कर्मचारी व अधिकाऱ्यावर कामाचा ताण जास्त वाढत आहे असे असल्यामुळे महाराष्ट्र शासनाने नियमात बदल करून कर्मचारी व अधिकाऱ्यांना शनिवार व रविवार ला पूर्ण सुट्टी दिली पण त्या बदल्यात शासनाने कर्मचाऱ्यांच्या कामाच्या वेळेत बदल केला.तो असा की,सोमवार ते शुक्रवार कार्यालयात कर्मचारी व अधिकारी येण्याची वेळ ९:४५ मिनिटाची असून कार्यालयातून जाण्याची वेळ ही सायंकाळी ६:१५ मि. करण्यात आली तर शिपायाची वेळ ही ९:३० ते सायंकाळी ६:३० करण्यात आली,पण शासनाच्या या वेळेच्या नियमाला काही कर्मचारी व अधिकारी अक्षरशः पायाखाली तुडवत आहे.असेच काही कारंजा तालुका कृषी अधिकारी कार्यालयामध्ये पाहावयास मिळाले,या कार्यालयातील काही कर्मचारी व तालुका कृषी अधिकारी १०:३० वाजले तरी कार्यालयामध्ये हजर नव्हते,याबाबत माहिती घेतली असता ते कर्मचारी व अधिकारी का हजर नाहीत याची हालचाल रजिस्टर मध्ये कुठेही नोंद नव्हती.भारत हा कृषिप्रधान देश आहे.भारताची अर्थव्यवस्था ही शेतीवर अवलंबून आहे.शेतकऱ्यांच्या समस्या, शेतकऱ्यांच्या अडचणी, शेतकऱ्याच्या विविध योजना शेती मधील पिका संबंधी माहिती व उपाय योजना,याबाबत सर्व माहिती तालुका कृषी अधिकारी कार्यालय मधून चालतात पण या कार्यालयाचे कर्मचारी व अधिकारी जर रोजच वेळेवर येत नसेल तर शेतकऱ्यांच्या समस्या कशा सुटणार,आणि शेतकऱ्याला आपन आत्महत्या करण्या पासून कसे वाचवणार हा मोठा गंभीर प्रश्न उपस्थित होता आहे.कर्मचारी वेळेवर येत नसल्याची समस्या ही एकाच कार्यालयाची नसून कारंजा तालुक्यातील पंचायत समिती, तहसील कार्यालय, भुमिअभिलेख कार्यालय, उपविभागी कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग,नगर परिषद, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, आरोग्य विभाग अशा अनेक कार्यालयाची हीच परिस्थिती आहे. तेव्हा जिल्हाधिकारी साहेब वाशिम यांनी प्रत्यक्ष कार्यालयीन वेळेत भेट देऊन कारवाई करणे गरजेचे आहे.



## थोडक्यात

### वाशिमच्या विकासाच्या मार्ग मोकळा -मुख्यमंत्र्यांची घेतली भेट

**आ.शाम खोडे व नगराध्यक्ष केंदळे यांचा पुढाकार**

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशीम शहराच्या विविध रस्त्याच्या कामाच्या निधी सोबत विकासाचे अनेक प्रश्न घेऊन वाशिम मंगरूळपीर विधानसभा आमदार श्याम खोडे यांच्या नेतृत्वात नगराध्यक्ष अनिल केंदळे यांनी पुढाकार घेत राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा निवासस्थानी भेट घेऊन शहराच्या सर्वांगीण विकासाकरिता व रस्त्या करिता निधीची मागणी केली आहे मुख्यमंत्री फडवणीस यांनी तात्काळ सर्व कामासाठी निधी उपलब्ध करून देऊन विकासाचे सर्व प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन यावेळी दिले त्यामुळे वाशिम शहराच्या सर्वांगीण विकासाचा मार्ग प्रशस्त झाला आहे. आमदार शाम खोडे यांच्या नेतृत्वात वाशिम मंगरूळपीर विधानसभा क्षेत्रामध्ये विकास कामाला मोठे प्राथमिकता दिल्या जात आहे कोट्यावधी रूपाचा निधी त्यांनी त्यांनी इथून आणला असून ठीक ठिकाणी विकासाचा श्री गणेशा केलेला आहे जनतेने विकासाकरिता भाजपाचे अनिल केंदळे यांना मोठ्या मताधिक्याने नगराध्यक्षपदी विजयी केले. त्यामुळे नगराध्यक्ष केंदळे यांनी वाशिम शहराच्या चेहरा मोहरा बदलण्यासाठी पुढाकार घेतला असून जनतेला दिलेल्या सर्व आश्वासनाची पूर्तता करण्याच्या दृष्टिकोनातून महत्वपूर्ण पाऊल पुढे टाकत आहे आमदार खोडे व नगराध्यक्ष केंदळे यांच्या जोडीने वाशिम शहराचे संपूर्ण रस्ते व विकासाच्या दृष्टिकोनातून सर्व बाबी पूर्ण करण्याकरिता पुढाकार घेतलेला आहे त्याच दृष्टिकोनातून त्यांनी मुख्यमंत्री यांची भेट घेऊन निधीची मागणी केली आहे वाशिम शहराच्या विकासाकरिता व मतदार संघाच्या विकासाकरिता मुख्यमंत्री स्वतः सकारात्मक असून त्यांनी यावेळी आमदार खोडे व नगराध्यक्ष केंदळे यांचे अभिनंदन केले आहे. लवकरच मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होणार असल्याच चित्र दिसत आहे. यावेळी आमदार शाम खोडे, नगराध्यक्ष अनिल केंदळे यांच्यासमवेत सामाजिक कार्यकर्ते निलेश सोमानी , प्रदीप देशमुख व वैभव वायचाळ उपस्थित होते.

# ग्राहक हक्कांविषयी जागरूकतेचा संदेश !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●



तहसील कार्यालयाच्या नवीन सभागृहात १७ मार्च २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय (पुरवठा शाखा), तहसील कार्यालय व अखिल भारतीय ग्राहक पंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक ग्राहक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे जिल्हाध्यक्ष जुगलकिशोर कोठारी होते. प्रमुख अतिथी म्हणून उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर उपस्थित होत्या. तसेच मार्गदर्शक म्हणून अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे सचिव ?ड. सुधीर घोडचर यांच्यासह महिला प्रतिनिधी संगीता इंगोले, संघटनमंत्री प्रांजलकुमार जैन, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष वृषाली टेकाळे, मंगरूळचे तालुकाध्यक्ष संजय राठी, जेष्ठ सदस्य गजाननराव साळी, तहसीलदार निलेश पळसकर, नायब तहसीलदार प्रतिभा चौधरी, निरीक्षण अधिकारी मनोज लटारे, सदस्य प्रदीप टाकळकर, मिलींद इंडेन गॅस एजन्सीचे प्रतिनिधी मिलींद सोनोने, श्री बालाजी भारत गॅस एजन्सीचे प्रतिनिधी आशिष हुरकट व रास्तभाव दुकानदार संघटनेच्या तालुकाध्यक्ष प्रेमा सोमानी आदी मान्यवर उपस्थित होते. यानंतर प्रमुख अतिथींचे स्वागत करण्यात आले.

मार्गदर्शन करताना अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे सचिव ॲड. सुधीर घोडचर यांनी स्मार्ट विद्युत मीटर, ग्राहकांच्या समस्या, वाढीव वीज बिलांची कारणे, ग्राहकांनी घ्यावयाची काळजी, वीज बिल कमी करण्याचे उपाय तसेच विद्युत कायदा २००३ अंतर्गत तक्रार निवारण यंत्रणेची सविस्तर माहिती दिली. उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर व जिल्हाध्यक्ष जुगलकिशोर कोठारी यांनी ग्राहकांचे कायदे व हक्क या विषयावर मोलाचे मार्गदर्शन करत जागरूकतेचे महत्त्व अधोरेखित केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक तहसीलदार निलेश पळसकर यांनी केले.

सूत्रसंचालन कनिष्ठ लिपीक अनिता देशमुख यांनी तर आभार कनिष्ठ लिपीक निकिता घुगे यांनी मानले. कार्यक्रमास ॲड. पवन भंसाली, गजानन व्यवहारे, अरविंद भगत, प्रमोद लक्रस, सय्यद इरफान, सोनाली गर्जे, नामदेवराव बोरचारे, जगदीश बोरा, सुनिल महाजन, भुषण देशपांडे, वसंतराव इंगोले हे उपस्थित होते.

## गोपाल वाडेच्या जिद्दीला सलाम... १२ वर्षांच्या खंडानंतर प्रथम श्रेणीत वकील !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

माणसामध्ये काहीतरी करून दाखवण्याची जिद्द आणि चिकाटी असेल, तर वयाचे किंवा परिस्थितीचे कोणतेही बंधन आडवे येत नाही, हे शिरपूर येथील गोपाल ज्ञानबा वाढे यांनी सिद्ध करून दाखवले आहे. घरची परिस्थिती बेताची असताना आणि तब्बल १२ वर्षांचा शैक्षणिक खंड असूनही, गोपाल वाढे यांनी पहिल्याच प्रयत्नात एल.एल.बी. परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण केली आहे. इतकेच नव्हे तर, 'ऑल इंडिया बार एक्झाम' यशस्वीपणे पूर्ण करून वकिलीची सनद मिळवत त्यांनी शिरपूर भागातून अनुसूचित जातीच्या समाजातील पहिले वकील होण्याचा बहुमान पटकावला आहे.



वडिलांचा वारसा आणि संघर्षाची शिदोरी गोपाल वाढे यांचा हा प्रवास अत्यंत खडतर राहिला आहे. घरी शेती नसतानाही, त्यांचे वडील ज्ञानबा वाढे यांनी आपला पिढीजात बूट-चप्पल बनविण्याचा व्यवसाय करून कुटुंबाचा गाडा हाकला. अत्यंत तुटपुंज्या उत्पन्नात त्यांनी आपल्या तीन मुलींची लग्ने लावून दिली आणि मुलगा गोपाल याचे पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. वडिलांच्या या कष्टाची जाणीव ठेवूनच गोपाल यांनी आज हे यश संपादन केले आहे.

## तीन वर्षांपासून स्ट्रिट लाईट रात्रंदिवस सुरू !

**शहापूर - सोनखास परिसरात विजेचा मोठा अपव्यय**

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

शहर सीमा भागातील ५ हजार लोकवस्तीच्या नविन सोनखास-शहापूर परिसरात २०२३ पासून तब्बल तिन वर्षांपासून स्ट्रीट लाईट रात्रंदिवस सुरू असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या परिसरातील शेकडो नव्हे तर जवळपास हजाराच्या आसपास लाईट दिवसाही सुरू राहत असल्याने मोठ्या प्रमाणात वीजेचा अपव्यय होत असून प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या संदर्भात जांब-सोनखास-शहापूर ग्रामपंचायतने सचीव व संरपंचाच्या सहीने Maharashtra State Electricity Distribution Company Limited च्या मंगरुळपीर कार्यालयास दि.१८-४-२०२४ रोजी याबाबत पत्र दिले होते. त्यामधे विज पुरवठ्याचे तांत्रीक बिघाड व लोबकळलेल्या तारा दुरुस्त करण्याची विनंती केली होती. त्यानंतरही याबाबत विचारणा केली होती. मात्र याला २ वर्षे होत आले असतांनाही याची विज वितरण कंपनीने दखल घेतली नसल्याचे पुढे आले आहे. या भागात आठशे ते १ हजार विजेचे बल्ब खांबावर आहेत. या बल्बमूळे दिवसा १३-१४ तास विजेचा वापर नाहक सुरू राहिल्यास दररोज दिडशे ते २०० युनीट्स जळतात. महिनाभरात ४ ते ६ हजार युनीट विज ही फक्त दिवसा गरज नसतांना व्यर्थची जात आहे. ही देशाची संपत्ती नाहक खर्च होत आहे.याचे महिण्याचे विज बिल ७५ हजाराच्या घरात जाते.असा हा प्रकार ३ वर्षापासुन सुरू आहे. याचा ३ वर्षाचा खर्च ३० ते ४० लाखाच्या घरात जातो. ही बाब अत्यंत गंभीर असल्याने मावळा संघटनेचे उपाध्यक्ष राहुलदेव मनवर यांनी ग्रामपंचायत ची भेट घेवून विज वितरण कंपणी चे सहाय्यक अभियंता एस. एस. जयपुरकर यांची भेट घेवून हा प्रश्न त्वरीत सोडविण्याची मागणी केली.

***३ वर्षात ५० लाख रु ची विज खाक.**
***ग्रा.पं.च्या पत्राकडेही दुर्लक्ष.**
***जबाबदारी कोण घेणार.**



कष्टांचा झरा, जिद्दीचा सहारा...

# उमाचा पोलिस भरतीत यशाचा तारा !

● सिटी न्युज ब्युरो @ केनवड ●

रिसोड तालुक्यातील अंचळ या छोट्याशा गावातील अत्यंत गरीब कुटुंबातील मुलगी उमा धोंडुजी बांगर हिने आपल्या जिद्दीच्या आणि अथक परिश्रमाच्या जोरावर पोलीस भरतीत घवघवीत यश संपादन केले आहे. सोलापूर येथे पार पडलेल्या पोलीस शिपाई भरती प्रक्रियेत उमाने पहिल्याच प्रयत्नात उल्लेखनीय कामगिरी करत निवड मिळवली असून, तिच्या या यशामुळे संपूर्ण अंचळ गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दि. २० मार्च रोजी सोलापूर पोलीस शिपाई भरतीचा निकाल जाहीर होताच उमाच्या यशाची बातमी गावात पोहोचली आणि ग्रामस्थांनी जल्लोष साजरा केला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढत उमाने हे यश मिळवले आहे.उमाचे वडील धोंडुजी बांगर आणि आई चंद्रकला बांगर हे शेतमजुरीसोबत लग्नसराईत मंडपाचे छोटे काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. आर्थिक परिस्थिती बेताची असतानाही त्यांनी मुलीच्या शिक्षणात आणि स्वप्नपूर्तीत कोणतीही तडजोड होऊ दिली नाही.उमाचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, अंचळ येथे झाले. त्यानंतर तिने पुढील शिक्षण नेतंसा येथील विद्यालयात पूर्ण केले. लहानपणापासूनच पोलीस होण्याचे स्वप्न डोळ्यांत साठवलेल्या उमाने सातत्याने प्रयत्न सुरू ठेवले. तिने लातूर जिल्ह्यातील रेणापूर येथे 'भगतसिंह अकादमी'मध्ये प्रवेश घेत पोलीस भरतीचे विशेष प्रशिक्षण घेतले. प्रशिक्षणादरम्यान तिने शारीरिक तसेच लेखी परीक्षेसाठी कठोर मेहनत घेतली. त्याचा परिणाम म्हणून ग्राउंडमध्ये ४७ गुण आणि एकूण ११० गुणांसह ती उत्तीर्ण झाली.उमाच्या यशामुळे तिच्या आई-वडिलांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. 'मुलीने आमचे कष्ट सार्थ केले,' अशी भावना त्यांनी व्यक्त केली. गावातील ग्रामस्थांनीही तिचे व कुटुंबियांचे अभिनंदन केले. पंचक्रोशीत तिच्या यशाची चर्चा रंगली असून अनेक ठिकाणी तिचा सत्कार होत आहे.दरम्यान, अकादमीच्या संचालकांनी तिच्या राहत्या घरी भेट देत तिचे अभिनंदन केले. उमाच्या यशामुळे गावातील युवक-युवतींना नवी प्रेरणा मिळाली असून पोलीस भरतीसाठी उत्साह वाढला आहे.





**उमाच्या यशाबद्दल पिंप्री सरहद्द येथील जय गजानन ग्रुपकडून आई वडीलांचा गौरव**

उमा बांगर हिच्या पोलीस भरतीतील निवडीबद्दल पिंपरी सरहद्द येथील जय गजानन ग्रुपच्या वतीने तिचा गौरव करण्यात आला. ग्रुपचे सदस्य हरिभाऊ हजारे, संतोष इंगळे, प्रभाकर नाईकवाडे व ज्ञानेश्वर गवळी यांनी तिच्या राहत्या घरी जाऊन तिच्या आई-वडिलांचा सत्कार केला.उमाच्या या यशामुळे तिच्या कुटुंबियांचा आनंद द्विगुणित झाला असून, त्यांच्या कष्टाचे चीज झाल्याची भावना व्यक्त करण्यात आली.उमाचे आई-वडील मंडप डेकोरेशनचा व्यवसाय करत असून, त्यांच्या साध्या आणि प्रेमळ स्वभावामुळे पिंपरी सरहद्द व परिसरातील गावांमध्ये त्यांची चांगली ओळख निर्माण झाली आहे. सर्वांशी सलोख्याने वागण्याच्या त्यांच्या स्वभावामुळे गावकऱ्यांमध्ये त्यांना विशेष मान आहे.उमाच्या यशामुळे पिंपरी सरहद्द येथील ग्रामस्थांमध्येही आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, सर्व स्तरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

पिंप्री सरहद्द येथील मुस्लिम बांधवांकडून देखील उमाचा,व आई-वडिलांचा सन्मान उमा बांगर हिच्या पोलीस भरतीतील यशाबद्दल परिसरातील मुस्लिम बांधवांकडून तिचा व तिच्या आई-वडिलांचा सत्कार करण्यात आला. उमाच्या या यशामुळे समाजातील सर्व स्तरांत आनंद व्यक्त करण्यात येत असून, तिच्या कष्टाचे सर्वत्र कौतुक होत आहे. यावेळी मुस्लिम बांधवांनी उमाच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत तिच्या यशाचा अभिमान व्यक्त केला. विविध समाजघटकांनी एकत्र येऊन केलेल्या या सत्कारामुळे सामाजिक ऐक्याचे सुंदर उदाहरण पाहायला मिळाले. या प्रसंगी फिरोजशहा, हसन बागवान, पप्पू भाई, हुसेन शहा आदी उपस्थित होते.

## उष्माघातापासून बचावासाठी नागरिकांनी दक्षता घ्या - जिल्हाधिकारी

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणची बैठक**

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

गत दोन आठवड्यापासून उन्हाची तिव्रता अचानक वाढली असून उष्णतेच्या बाबतीत वाशिम जिल्हा नेहमीच अग्रस्थानावर असतो. यावर्षीसुध्दा तापमान वाढण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांनी उष्माघाताबाबत काळजी घ्यावी, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात शुक्रवारी (दि. २०) रोजी आयोजित जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पी. एस. ठोंबरे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत यांच्यासह विविध यंत्रणांचे प्रमुख उपस्थित होते.



जिल्हाधिकारी श्री. कुंभेजकर पुढे बोलतांना म्हणाले, दिवसा व रात्रीच्या उकाड्यात वाढ झाली असून सामान्यपेक्षा तापमान जास्त राहण्याची शक्यता आहे. उष्णतेची लाट लक्षात घेता प्रशासनाने सज्ज राहणे आवश्यक आहे. कामाच्या ठिकाणी थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी. दुपारी १२ ते ४ या वेळात कोणतेही कार्यक्रम घेऊ नयेत. लहान मुले, वयोवृध्द नागरिक आणि व्याधीग्रस्त नागरिकांची विशेष काळजी घ्यावी. प्रत्येक स्तरावर उष्माघाताबाबत जनजागृती करावी. शाळा, अंगणवाडी आदींच्या वेळेत बदल करण्याचे शिक्षण विभागाने निर्देश द्यावेत, तसेच आरोग्य यंत्रणाही सतर्क ठेवावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

शनिवार, दि. २१ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# जनता भाजी बाजार परिसरातील कचरा तातडीने उचलण्यात यावा

प्रतिनिधी २२ मार्च

**अकोला:** जनता भाजी बाजार परिसरात कचऱ्याचे ढीग; नागरिकांचे आरोग्य धोक्यात दिसून येते. शहराच्या स्वच्छतेकडे विशेष लक्ष देण्याचे आवाहन स्थायी समिती सभापति विजय अग्रवाल यांनी स्वच्छता विभागाच्या आढावा बैठकीत केले होते. मात्र, असे असूनही महानगरातील कचरा संकलन व्यवस्था अद्याप पूर्णपणे कार्यान्वित झालेली नाही. सद्यस्थितीत शहराच्या जनता भाजी बाजार परिसरात मोठ्या प्रमाणात कचऱ्याचे ढीग साचले असून, यामुळे स्थानिक नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. प्राप्त माहितीनुसार, जनता भाजी बाजारपेठेतील विक्रेते सायंकाळच्या वेळी आपला उरलेला किंवा खराब झालेला माल बाजारपेठेतील कचरा कुंडीत किंवा शेजारीच असलेल्या मुंगीलाल बाजोरिया शाळेच्या मैदानावर फेकून देतात.

# पुंडा गावातील ग्रामस्थांचे तलावातील दूषित पाण्याने आरोग्य धोक्यात

## ◆ दलित वस्तीत २५ दिवसांपासून पाण्यासाठी वणवण

प्रतिनिधी २२ मार्च

**अकोट:** एकीकडे 'हर घर नल, हर घर जल'च्या घोषणा दिल्या जात असताना, पुंडा गावातील दलित वस्तीत मात्र गेल्या २५ दिवसांपासून थेंबभर पाणी आलेले नाही. भीषण पाणीटंचाईमुळे येथील नाईलाजास्त नागरिकांना शेजारच्या तलावातून पाणी आणून आपली तहान भागवावी लागत आहे. मात्र हे पाणी अत्यंत दूषित असल्याने वस्तीतील नागरिकांचे आरोग्य आता गंभीर धोक्यात आले आहे.

### जीवन प्राधिकरणाच्या कारभारावर संताप

गावाचा विस्तार मोठा असूनही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून पाणीपुरवठा अत्यंत कमी वेळ केला जातो, असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यातच वस्तीच्या भागात पाण्याचा दाब (प्रेशर) नसल्यामुळे नळांना पाणीच पोहोचत नाही. वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून याकडे दुर्लक्ष केले जात असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

### आरोग्याचा प्रश्न गंभीर

पाणी नसल्याने महिलांना आणि अबालवृद्धांना डोक्यावर हंडे घेऊन तलावाची वाट धरावी लागत आहे. तलावातील पाणी अस्वच्छ आणि दूषित असल्याने वस्तीत साथीचे आजार पसरण्याची भीती निर्माण झाली आहे. आम्हाला वेळेवर आणि पुरेसे पाणी न मिळाल्यास आंदोलना शिवाय पर्याय नाही, असा इशारा वस्तीतील त्रस्त महिलांनी दिला आहे. आता तरी संबंधित विभागाने कुंभकर्णी झोपेतून जागे होऊन या दलित वस्तीचा पाणीप्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावावा, अशी मागणी जोर धरत आहे यावेळी सर्व गावांमध्ये पाण्याचा हाहाकार होत असून विषयाला पाण्यामुळे पूर्ण गाव पेटले आहे.



एक महिन्यापासून पाणीच नाही त्यामुळे गावातील तलावावर लहान लहान मुलं घेऊन जावे लागते लहान लेकरू जर तलावा डुबली याला जबाबदार कोण राहील- **नंदकिशोर कलाने,** वस्तीतील नागरिक

एक महिना झाले पाणी नाही आम्ही तया मधील पाणी पिऊन बिमार पडलो तर आमचे लेकरं मारून टाकावे काय पाणी नाही भेटले तर आम्ही सर्व अकोटला येऊ रिकामे भदाळ घेऊन पाणी आणायला- **बेबीबाई वाकोडे** गृहिणी पुंडा

नगावातील दलित वस्ती तसेच पूर्ण गल्ल्याबोळा पाणी मिळत नाही दलित वस्तीत किंवा पूर्ण गल्ल्यात प्रेशरच नाही जीवन प्राधिकरण त्यांचे कर्मचारी प्रेशर पूर्ण प्रेशर द्यावे ग्रामपंचायत पाण्याची नियोजन कसे करेल नागरिक मारायला येत आहेत नागरिक पाणी मागत आहेत पैसा नाहीत,पूर्ण प्रेशर द्या याला सर्व कारणीभूत तुमची कर्मचारी व जीवन प्राधिकरच राहील,
**सुधाकर पुंडकर,** उपसरपंच पुंडा

# गुलजारपुरा ते दगदीपूल रस्त्यावर उभी वाहने त्रासदायक



प्रतिनिधी २२ मार्च

**अकोला:** शहरातील विविध भागात चुकीच्या पद्धतीने उभ्या वाहनांमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. असे चित्र गुलजारपुरा दगदीपुल मार्गावर दिसते. वाहने कशीही उभी राहतात. त्याचा त्रास रस्त्याने येणाऱ्या जाणाऱ्यांना होतो. वाट काढत दुचाकी काढावी लागते. वाहतूक शाखा पोलिसांनी याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

चार चाकी वाहनांमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे परिसरातील तसेच शहराच्या अन्य भागातून ये जा करणा-या वाहन चालकांची पंचाईत होते. वाहन पार्क करताना त्याचा इतरांना त्रास होणार नाही इतके भान ठेवावे लागेल. नाही तर दररोजचा त्रास काही केल्या कमी होणार नाही. या बाबतीत ठोस पावले उचलली जावी अशी मागणी केली जात आहे.

# डॉ. कल्याणी गादीया यांना राष्ट्रीय पुरस्कार प्रदान



प्रतिनिधी २२ मार्च

**अकोला** :ऑल इंडिया ऑप्थॅलमिक सोसायटीच्या जयपूर येथे झालेल्या ८४ व्या अधिवेशनात येथील डॉ. कल्याणी गादीया यांना प्रेम प्रकाश दिशा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

स्क्विंट ( डोळ्यांचा तिरळेपणा) या विषयावर डॉ. कल्याणी गादीया यांनी लिहिलेल्या शोधनिबंधाला हा पुरस्कार एम्सचे नेत्र चिकित्सा विभागाचे एचओडी आणि एआयओएस चे आगामी अध्यक्ष डॉ. जे. एस. टिटीयाल यांचे हस्ते आणि ऑल इंडिया ऑप्थॅलमिक सोसायटीचे अध्यक्ष डॉ. पार्थ बिस्वास आणि अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. डॉ . कल्याणी गादीया यांनी मुंबई येथील सायन हॉस्पिटल आणि लोकमान्य टिळक शासकीय महाविद्यालयातून एमबीबीएस पदवी प्राप्त केली असून पुणे येथील एच. व्ही. देसाई या ख्यातनाम संस्थेतून पदव्युत्तर शिक्षण घेतले आहे. कर्नाटकातील हुबळी येथील एन.एम. जोशी या संस्थेतून शिशू नेत्ररोग या विषयात फेलोशीप पूर्ण केली आहे.येथील गादीया आय आरोग्य सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल मध्ये त्या शिशू नेत्ररोग तज्ञ म्हणून कार्यरत असून तिरळे डोळे सरळ करणे, बालकांमधील मोतीबिंदू शस्त्रक्रिया करणे आणि प्री मॅच्युअर बेबीमधील रेटीनावर लेजर आणि अन्य उपचार त्यांनी यशस्वीपणे केले आहेत.अकोला ऑप्थॅलमिक ऑर्गनायझेशनच्या वतीने डॉ . कल्याणी यांचे अभिनंदन करण्यात आले आहे.

# कौशल्य विकास केंद्राचा मंगळवारी टीसीएस प्लेसमेंट ड्राईव्ह

**अमरावती:** सुशिक्षित बेरोजगारांसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रामार्फत पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मोहिमेंतर्गत रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या स्वामी विवेकानंद विद्यार्थी भवनात मंगळवार, दि. २४ मार्च रोजी सकाळी १० वाजता हा मेळावा होणार आहे.

या मेळाव्यामध्ये टाटा कंसल्टंसी सर्व्हीसेस या नामांकित आयटी कंपनीमार्फत बीपीएस पदासाठी भरती प्रक्रीया राबविण्यात येणार आहे. सदर भरती प्रक्रियेसाठी वयोमर्यादा १८ ते २८ वर्षे असून शैक्षणिक पात्रता बीए, बीकॉम, बीबीए, बीसीसीए, बीव्हीओसी, बीएससी जनरल आहे. यात २०२३ आणि २०२४ यावर्षात उत्तीर्ण, तसेच एमए, एमकॉम २०२४ आणि २०२५ उत्तीर्ण पात्रता निकष राहणार आहे. निवड प्रक्रिया ही कागदपत्र पडताळणी, योग्यता परीक्षा, प्रत्यक्ष मुलाखतीतून होणार आहे.

# गोरव्हा गावाजवळ मालवाहू वाहनाला भीषण आग!

प्रतिनिधी २२ मार्च

**अकोला:** कान्हेंरी -गोरव्हा मार्गावरील गोरव्हा गावाजवळून जाणाऱ्या एका मालवाहू वाहनाला अचानक आग लागली आणि पाहता पाहता हे वाहन आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. आगीने रौद्र रूप धारण केल्यानंतर वाहनातील गॅस सिलिंडरचा मोठा स्फोट झाला, ज्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते.

चालत्या वाहनाने अचानक पेट घेतल्याने वाहन 'धु-धु' जळू लागले. आगीची तीव्रता वाढल्याने वाहनात असलेल्या गॅस सिलिंडरचा जोरदार धमाका झाला. या आवाजामुळे रस्त्यावरून जाणारे नागरिक आणि वाहनधारकांमध्ये मोठी घबराट निर्माण झाली. स्फोट इतका भीषण होता की सुरुवातीला कुणीही वाहनाजवळ जाण्याचे धाडस केले नाही. मात्र, आगीची धग थोडी कमी झाल्यावर स्थानिक नागरिकांनी आग



विझवण्याचा प्रयत्न केला.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. या आगीमुळे रस्त्यावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. सुदैवाने, या भीषण घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही, परंतु आगीत संपूर्ण वाहन जळून खाक झाले आहे.

# रेल्वे स्टेशन ते अग्रसेन चौक दरम्यान लागलेले पथदिवे कधी सुरू होणार



प्रतिनिधी २२ मार्च

**अकोला:** रेल्वे स्टेशन ते अग्रसेन चौकापर्यंत दुभाजकाचे सौंदर्यीकरण करून पथदिवे लागले आहेत. परंतु ते बंद असल्याने नागरिकांना काहीही उपयोग होत नाही. अंधारातून वाटचाल करावी लागत आहे. महापालिका प्रशासन मुहूर्त शोधत आहे का असा प्रश्न पडला आहे. फक्त एक दिवस दिवे लागले होते. त्यानंतर सुरू झाले नाहीत.

या मार्गाचे सुशोभिकरण छान झाले आहे. दुभाजकात झाडे लावली आहे. तसेच झुंबर पद्धतीचे पथदिवे लागले आहेत. ते सुरू झाले की परिसराच्या सौंदर्यात भर पडणार आहे. फक्त प्रश्न आहे तो दिवे सुरू होण्याचा. या बाबतीत तांत्रिक अडचणी दूर करून पथदिवे सुरू करावे अशी मागणी केली जात आहे.

न्यू तापडिया नगर भागात सध्या पथदिवे लावले जात आहे. काही ठिकाणी खांब लागत आहे. पुलापर्यंत लागलेले पथदिवे सुरू झाले होते. परंतु त्यात नियमितता नाही. पथदिवे नेहमी सुरू राहतील याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

# आपद काळात केवायसीसाठी अडवणूक कशाला?

## ◆ गॅसधारकांचा आक्रोश : कामधंदे सोडून लावाव्या लागतात रांगा

प्रतिनिधी २२ मार्च

**अकोला :** गरीब असो वा श्रीमंत गॅस सिलिंडर आज सर्वांसाठी मूलभूत गरज बनली आहे. आधीच सरकारने रॉकेलचा कोटा बंद करून गोरगरीबांचा हक्क हिरावला आहे. आता गॅस सिलिंडरचा तुटवडा असताना आणि सर्वसामान्यांना ते सहजासहजी मिळत नसताना मधातच केवायसीचा खोडा घातला आहे. आतापर्यंत विना केवायसी सर्व सुरळीत असतानाच आताच अशा टंचाईच्या काळात केवायसीचा अट्टहास का, असा प्रश्न सर्वसामान्य नागरिक व्यक्त करीत आहेत. हातावर आणणे आणि पानावर खाणे असे रोजमजुरीवर जीवन जगत असताना आता गॅस सिलिंडरसाठी व केवायसीसाठी गॅस एजन्सीसमोर रांगा लावाव्या लागत आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण पसरत असून, त्यांच्या संयमशीलतेचा केव्हा





स्फोट होईल, हे सांगणे कठीण आहे.

इराण-अमेरिका, इस्त्राइल युद्धाचे पडसाद भारतात आणि तेही सर्वसामान्यांच्या चुलीपर्यंत पोहोचले आहेत. नागरिकांना मूलभूत व अत्यावश्यक गरज असलेल्या गॅस सिलिंडरसाठी सकाळपासूनच रांगा लावाव्या लागत आहेत. त्यात आता केवायसी नसल्याने शेकडो मोलमजुरी करणाऱ्या व सर्वसामान्य नागरिकांची सेसहोलपट सुरू आहे. आधी कागदपत्रे घेऊन रांगेत लागा, केवायसी करा, त्यानंतर तुमचे सिलिंडर बुकींग होईल असे त्यांना सांगण्यात येत आहे. त्यामुळे नागरिकांचा संताप अनावर होत आहे. आतापर्यंत आम्हाला सहज गॅस सिलिंडर मिळत असताना आताच त्यासाठी हट्ट का, आमची जर केवायसी नव्हती तर आतापर्यंत आम्हाला गॅस सिलिंडर तेही बुकींग करून कसे मिळत होते, असे ग्राहकांचे म्हणणे आहे. जर केवायसी करायचीच असेल तर आधी आमची चूल पेटू द्या, त्यानंतर आमच्यावर सक्ती करा, असे अनेक प्रश्न नागरिक व्यक्त करीत आहेत. तसेच जर आमच्याकडे आपल्या एजन्सीचे पुस्तक आहे, आमच्या नावाची व मोबाइल नंबरची नोंद आहे तर गॅस पुस्तकावर एन्ट्री करून आमची तात्पुरती व्यवस्था करता येत असतानाही सर्वसामान्यांना विनाकारण हेलपाटे मारण्यास लावत असून इतरांना मात्र घरपोच गॅस सिलिंडर विनासायास दामदुप्पट घेऊन मिळत असल्याचेही अनेक ग्राहकांनी नाव न सांगण्याच्या अटीवर आपल्या भावना व्यक्त केल्या.

सध्या पुरवठा विभागाद्वारे घरगुती गॅसचा अवैध वापर व साठ्यावर धडक कारवाया सुरू आहेत. यावरून मोठ्या प्रमाणात गॅस सिलिंडरचा काळाबाजार होत असल्यावर एकप्रकारे शिक्कामोर्तब होत आहे.

### पुरवठा विभागाकडून मोठ्या कारवाईची अपेक्षा!

जिल्हा पुरवठा विभागाने आतापर्यंत छोट्या-छोट्या कारवायाच केल्या आहेत. जर त्यांनी मोठमोठे हॉटेल व स्वीटमार्टच्या ठिकाणी छापे टाकल्यास मोठे घबाड समोर येण्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण जिल्ह्यात व्यावसायिक सिलिंडरचा नगण्य पुरवठा होत असतानाही एवढ्या दिवसांपासून हे हॉटेल व स्वीटमार्टची दुकाने विनाअडथळा कशी सुरू आहेत, त्यांना सिलिंडरचा पुरवठा कसा होतो, हे न सुटणारे कोडे बनले आहे. यांना दिवसाला पाच ते दहा सिलिंडर लागत असतानाही सध्या त्यांचे व्यवसाय कसे सुरू आहेत, याची चौकशी होणेही गरजेचे आहे.

### गॅस सिलिंडरचे गौडबंगाल अनाकलनीय?

अनेक गॅसधारकांचे म्हणणे आहे की, आम्ही आजपर्यंत आमच्या गॅस पुस्तकावर एकदाही सिलिंडर बुक केले नाही. मात्र आमच्या नावावर दहा ते १२ सिलिंडर उचलल्याची नोंद असून, आमच्या खात्यात सिलिंडर अनुदानाची ४ रूपये काही पैसे रक्कमही येत आहे. आता आम्हाला एक सिलिंडर देण्यासही मागे-पुढे पाहत आहेत. यावरून यामध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता दिसून येत असून, ऑनलाइन असतानाही असे प्रकार कसे होतात, हा संशोधनाचा विषय असल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे.


# जिल्ह्यातील 122 हेक्टरला अवकाळी पाऊस, गारपिटीचा तडाखा!

## ◆ सर्वाधिक नुकसान अकोट तालुक्यात, प्राथमिक अहवाल जाहीर

प्रतिनिधी २२ मार्च

**अकोला :** जिल्ह्यात गुरूवारी रात्री झालेल्या तुफान वारा, अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे रब्बी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. जवळपास १२२.२० हेक्टर क्षेत्रावरील पिके या अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे बाधित झाले असून सर्वाधिक तडाखा अकोट तालुक्यातील ८३ हेक्टर क्षेत्राला बसला आहे. यामध्ये उन्हाळी ज्वारी, मका, लिंबू, कांदा, पपई, टरबूज, हरभरा, गहू आदी पिकांचा समावेश आहे. पुन्हा एकदा निसर्गाचा फटका बसल्यामुळे शेतकरी वर्ग हवालदिल झाला असून, शासनाने नुकसानाची पाहणी करून भरपाई देण्याची मागणी त्यांच्याकडून करण्यात येत आहे.

गुरूवारी रात्री अकोला जिल्ह्याला अवकाळी पावसाने जोरदार तडाखा दिला. वादळी वाऱ्यासह पाऊस झाला. अकोट तालुक्यात गारांसह पावसाने हजेरी लावली. यामुळे रब्बी पिकांसह भाजीपाला पिकांचे अतोनात नुकसान झाले. काही ठिकाणी झाडे पडली. तसेच अकोला शहरासह अन्यत्र रात्री वीज पुरवठा खंडित झाला होता. जिल्ह्यात दोन दिवसांपासून ढगाळ वातावरण होते. परंतु गुरूवारी रात्री त्याचे रूपांतर पावसात झाले. वादळी वाऱ्यासह पाऊस झाला. अकोट तालुक्यातील ८३ हेक्टर क्षेत्रावरील पिके बाधित झाली.



### असे आहे जिल्ह्यातील नुकसान

◆जिल्ह्यातील पातूर तालुक्यातील दोन गावांना अवकाळी पाऊस व गारपिटीचा फटका बसला असून, ३८ हेक्टर क्षेत्रावरील उन्हाळी ज्वारी, मका, लिंबू, कांदा, पपई, गहू, मका आदी पिके बाधित झाली आहेत. तसेच अकोल्या तालुक्यातील एका गावातील १ हेक्टर २० आर क्षेत्रावरील मका पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. तसेच अकोट तालुक्यातील ९ गावांना अवकाळी पाऊस व गारपिटीचा तडाखा बसला असून, ८३ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. या क्षेत्रावरील उन्हाळी ज्वारी, संत्रा, लिंबू, कांदा, हरभरा, टरबूज, गहू या पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012 /49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK